
# साईलीला



बाबांनी केलेल्या भविष्याप्रमाणे दोन पाली भगिनींची प्रेमभेट

ऑक्टोबर

६० पैसे

१९७४

# अनुक्रमणिका – ऑक्टोबर १९७४


| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय | विजयादशमी, श्री बाबांची ५६ वी पुण्यतिथी |
| २. | नामसंकीर्तन | श्री. बाळकृष्ण धामणकर |
| ३. | शिरडीचे श्री साईबाबा व आम्ही | श्री. बी. आर. काकडे |
| ४. | शिरडीचे चोपदार-श्री. आप्पा भालेराव | सदानंद चेंदवणकर |
| ५. | फलज्योतिषाचा ओनामा | होरालंकार श्री. शं. बा. देवधर |
| ६. | श्री साईनाथ ललित चरित्र | श्री रं. श्री. पुजारी |
| ७. | पिळगावचे श्री साई सेवाधाम | श्री साईनंद |
| ८. | पावसचे स्वामी श्री स्वरुपानंद | श्री. रमाकांत पंडित |
| ९. | साईवंदन – कविता | सौ. माई आडकर |
| १०. | हेच सार | प्रा. डॉ. श्रीराम पंडित |
| ११. | शिरडी वृत्त | ऑगस्ट १९७४ |

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्री साई वाक्सुधा

काम क्रोध लोभ जाण । हीं नरकाचीं द्वारें तीन ।
यांचे पायीं आत्मविनाशन । यदर्थं निक्षून त्यागावें ॥ १५० ॥
परम दयाळू साई समर्थ । साधावया भक्त हितार्थ ।
तयां लागीं दक्षिणा मागत । शिक्षणही देत त्यागाचें ॥ १५१ ॥
दक्षिणेची काय किंमत । साधावया गुरुवचनार्थ ।
प्राणही द्यावया नाहीं जो उद्यत । तयाचा परमार्थ कायसा ॥ १५२ ॥
खरेंच भक्त कल्याणावीण । बाबांस काय दक्षिणेचें कारण ।
स्वयें तयांचें नव्हतें जीवन । अवलंबून दक्षिणेवरी ॥ १५३ ॥
पोटासाठीं भिक्षा मागत । दक्षिणेपोटीं नव्हता स्वार्थ ।
दक्षिणादानें शुद्धचित्त । व्हावेत निजभक्त हा हेत ॥ १५४ ॥

श्रीसाईसच्चरित — अध्याय १४ वा

---


## श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] ऑक्टोबर १९७४ [ अंक ७

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

● डॉ. श्री. दि. परचुरे, एम्. ए. पी. एच्‌डी., रा. भा. प्रवीण
● श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्‌सी., एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक रु. ०–६० फक्त.

*

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.
पीन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

# नामसंकीर्तन

१ हरी मुखे म्हणा – हरी मुखे म्हणा, पुण्याची गणना कोण करी।

२ धन्य तो एक संसारी वाचे नाम जो उच्चारी

३ जयाचिये वाचे विठोबाचे नाम, तयाचा तो जन्म सफळची।

४ नामा म्हणे फार सोपे हे साधन, वाचे नाम घेणे इतुकेची

५ पवित्र तो देह – वाणी पुण्यवंत, जो वदे अच्युत सर्वकाळ

६ नाम जयापाशी असे, नारायण तेथे वसे

७ ऐसा नामाचा महिमा, न कळेची आगमा – निगमा

८ नाम घेता नलगे मोल, नाम–मंत्र नाही खोल, दोन्हि अक्षराचे काम, उच्चारावे राम नाम

९ नित्यनेम प्रातःकाळी, माध्यानकाळी सायंकाळी नामस्मरण सर्वकाळी करीत जावे

१० कृतत्रेताद्वापारासी निषेध नाही नामासी, चारी मुक्ती दासी स्वये होती

११ नामे संकटे नासती, नामे विघ्ने निवारिती नामस्मरणे पाविजेती उत्तमपदे

१२ नाम स्मरे निरंतर ते जाणावे पुण्यशरीर महादोषांचे गिरिवर रामनामे नासती

१३ रामनामाचे पोवाडे अखंड ज्याची वाचा पढे धन्य तो एक संसारी राम नाम जो उच्चारी

१४ जयाचेनी नामे महादोष जाती, जयाचेनी नामे गती पाविजेती, जयाचेनी नामे घडे पुण्यठेवा, प्रभाते मनी राम चिंतीत जावा

१५ नव्हे कर्म ना धर्म ना योग काही, नव्हे भोग ना त्याग ना सांग काही, म्हणे दास विश्वास नामी धरावा, प्रभाते मनी राम चिंतीत जावा। [पान ४२ वर पहा]

संपादकीय

# विजयादशमी : श्रीबाबांची छप्पन्नावी पुण्यतिथी

विजयादशमी, दसरा हा भारतातील सणांपैकी एक प्रमुख सण समजला जातो. वर्णाश्रमाच्या युगात हा दुसरा सर्वश्रेष्ठ सण मानला जात होता. हा दिवस अत्यंत पवित्र समजला जात असल्याने कोणत्याही शुभकार्यास या दिवशी आरंभ करण्यात येतो. अनंतकोटी ब्रह्मांडनायक, राजाधिराज सच्चिदानंद श्रीसद्गुरु भगवान श्रीसाईनाथ महाराज याच दिवशी अनंतात विलीन झाले त्यामुळे श्रीसाईभक्त हा दिवस अतीव उत्साहाने साजरा करून श्रीसाईबाबांचे पुण्यस्मरण करतात.

अनेक ठिकाणी विजयादशमीची उत्पत्ती राम-रावण कथेशी जोडली जाते. भगवान प्रभू श्रीरामचंद्रानी रावणाचा वध करून मोठा विजय या दिवशी मिळविला, त्या आनंदाप्रित्यर्थ हा सण साजरा करण्यास सुरवात झाली असे अनेकांचे म्हणणे आहे. परंतु त्यांचे हे म्हणणे सुसंगत नसल्याचे दिसून येते. वाल्मीकी रामायणाच्या आधारे भगवान रामांनी रावणाचा वध चैत्र कृष्ण अमावास्येस केल्याचा उल्लेख आहे. 'अग्नीवेश रामायण' व 'पद्मपुराण' यामधून रावणाच्या वधाची तिथी अनुक्रमे वैशाख कृष्ण चतुर्दशी व फाल्गुन शुद्ध एकादशी अशी दिलेली आढळते. आश्विन शुक्ल दशमीस श्रीरामाची विजयतिथी कोणत्याहि ग्रंथाधारे सिद्ध होत नाही.

परंतु भविष्योत्तर पुराणाच्या आधारे एक तर्क करण्यात येतो तो असा की प्रभू रामचंद्राच्या स्मृतिप्रित्यर्थ नऊ दिवस सर्वत्र रामलीला चाले व दहाव्या दिवशी म्हणजे आश्विन शुद्ध दशमीस रावणाचा पुतळा करून त्याचे दहन करून रामलीला समाप्त होई. तेव्हा दहावा हा महत्त्वाचा दिवस असे समजून तो पाळण्यास सुरवात झाली, व चार वेद व सहा शास्त्रें यांचे पठन करून जो राक्षसांप्रमाणेच कामी व निर्बुद्ध राहिला अशा रावणाची दहा शिरे रामचंद्रांनी हरण केली व त्यामुळे या दिवसास 'दसहरा' किंवा कालांतराने 'दसरा' हे नाव पडले.

'दुर्गासप्तशती'त या दिवसाच्या उत्पत्तीची मनोरंजक कथा दिली आहे. ती अशी : "रौरव नावाचा एक दैत्य होता. त्याला दुर्गासूर नावाचा पुत्र होता. त्याने तप करून ब्रह्मदेवास प्रसन्न करून घेतले. तेव्हा ब्रह्मदेवाने त्यास असा वर दिला की, तू त्रैलोकाचा अधिपती होशील. तुला जिंकील असा वीर त्रिभुवनात असणार नाही. तेव्हा दुर्गासूरास इंद्रादि देव जिंकण्याची इच्छा झाली. त्याने अफाट राक्षस सेना एकत्र केली. मोठमोठे प्रबळ दैत्य दुर्गासूरास येऊन मिळाले. भृगु ऋषीचा पुत्र शुक्राचार्य ज्यास संजीवनी विद्या चांगली येत होती तो त्या अफाट राक्षस सेनेचा अधिपति झाला. त्यांनी प्रथम अमरपुरीवर स्वारी केली. तेव्हा इंद्रानेसुद्धा लढाईची तयारी केली. देवांचा गुरु बृहस्पती, यम, वरुण, चंद्र,

सूर्य, वायु इत्यादि इंद्रास मिळाले. लढाईस सुरवात झाली. दैत्याकडील मेलेले राक्षस शुक्राचार्य संजीवनीच्या साहाय्याने जिवंत करी, तर इकडे बृहस्पति द्रोणागिरी पर्वतावरून अमृत संजीवनी वल्ली नेऊन मृत देवांना उठवू लागला. शुक्राचार्याने ही हकीगत दुर्गासुरास सांगितली तेव्हा त्याने बृहस्पतीस द्रोणागिरी-वरून येताना पकडले व त्यास पाताळात डांबून टाकले. ही बातमी इंद्रास कळताच त्याचे अवसान गळले. तेव्हा दुर्गासूराने इंद्राचा पराभव करून इंद्र, चंद्र, वरुण, यम या सर्वांना पकडून ठेवले व आपण अमरपुरीचा राजा झाला.

नंतर शुक्राचार्याने दुर्गासूरास सांगितले की, आता काशी खालसा करावयाची आहे. तेथे शंकर, ब्रह्मदेव व विष्णू मिळतील. हे ऐकताच त्याने काशीवर चाल केली. पुरुषाच्या हातून तुला मरण नाही असा ब्रह्मदेवाने दुर्गासूरास वर दिला होता म्हणून शंकराने दुर्गासूरास ठार करण्याकरिता पार्वतीची निवड केली. शिवाच्या आज्ञेने पार्वती शस्त्रास्त्रांनी सज्ज झाली. तिने महायक्षिनी, भैरवी, योगिनी, मोहमाया, चामुंडा अशी छप्पन कोटी स्त्रियांची फौज घेतली. प्रत्यक्ष लढाईत महाहनु, असिलोमा, उग्रवीर्य, दुर्मुख, दुर्धर, विडाल, चिक्षुर, उग्रास्थ, चामर, बासकरल इत्यादि मोठमोठे राक्षस ठार झाले. काही राक्षसांना शुक्राचार्य उठवू लागला हे पाहून कोटराक्षी पुढे आली व तिने शुक्राचार्यास पकडून बंदीत टाकले. हे पाहून तालंजघाने एक पर्वत उखडून पार्वतीवर फेकला. पार्वतीने पर्वताचे शतशः तुकडे करून त्यास ठार मारले. यामुळे राक्षसे दुर्बळ होऊन मरण पावले. नंतर दुर्गासूर लढाईस उभा राहिला व त्याचा पार्वतीने वध केला. त्याच्या फौजेचा संहार केला. हे युद्ध नऊ दिवस चाललें होते.

दहाव्या दिवशी पार्वती विजयी होऊन तिने पुन्हा काशीत प्रवेश केला तीच आपली विजया दशमी. शंकर प्रसन्न झाले व त्यांनी तिला वर दिला की मी तुला तिन्ही लोकी पूज्य केले आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून अहोरात्र नऊ दिवस दुर्गासुराबरोबर युद्ध करून त्यास तू ठार मारलेस म्हणून मी तुला दुर्गादेवी असे नाव ठेवले असून तुझ्या पराक्रमाचा महिमा दहाव्या दिवशी सर्वत्र गायिला जाईल.

भारतातील सर्व प्रांतात विजया दशमीचा सोहळा साजरा करण्यात येतो. विशेषतः यादिवशी शमीचे पूजन सर्वत्रच केले जाते. त्यासंबंधीची कथा अशी – पांडव जेव्हा वनवासात निघाले तेव्हा त्यांनी आपली आयुधे शमी वृक्षाच्या खोडात ठेवून दिली. अज्ञातवास पुरा झाल्यावर त्यांनी खोडातून आपली सर्व शस्त्रे बाहेर काढली व त्यांची त्याच वृक्षाच्या पानांची पूजा केली. तो दिवस विजया दशमीचाच होता. तेव्हा त्या दिवशी शस्त्रांची पूजा शमीपर्णांनी करावी अशी प्रथा पडली. शमीपर्णास सोने म्हणतात. चला, विजयादशमीस ही सोन्याची पाने एकमेकास देऊन आपण आपल्या भेटी गाठी दृढ करूया. ● ● ●

श्री सद्‌गुरु साईबाबा यांचे "पुण्यतिथि" निमित्त खास लेख :—

# "शिरडीचे श्री साईबाबा" व आम्ही

लेखक : श्री. बी. आर. काकडे

शिरडीचे श्री साईबाबा यांचे विषयी जितके लिहावे तितके थोडेच आहे. कारण जे जे भक्त श्री साईबाबांविषयी आपला अनुभव जाहीर करतात ते त्यांची (श्री साईबाबांची) कीर्ती **किती अमर्याद** आहे हे दाखविणेसाठीच. त्याप्रमाणेच इतर भक्त मंडळींना या भक्ताचा (लेखक) स्वानुभव कळावा यासाठीच. आपण वेळोवेळीं श्री सदगुरू साईबाबांचे दरमहा अनेक लेख वाचतो, अनेक अनुभव वाचतो व अनुभवतो. म्हणूनच या वर्षी श्री सदगुरु साईबाबांची "पुण्यतिथी" माहे ऑक्टोबर तारीख २५ रोजीं येत असल्यानें त्या निमित्त श्री साईभक्तांना "बाबांचा प्रसाद" मिळावा या दृष्टीनेच हा लेख लिहिला आहे.

## "न्यारा संत"

श्री साईबाबा हे विसावे (चालू) शतकात महाराष्ट्र राज्यात नगर जिल्ह्यात कोपरगाव तालुक्यात शिरडी या अतिशय लहान गावी अवतरुन गेले. त्यांचा जन्मकाळ, नांव, गाव व जात, याचा पत्ता अद्याप जरी समजला नसला तरी "श्री साई" हे **न्यारे संत** होऊन गेले असे सर्वांचे **ठाम मत** आहे. कारण जर श्री साई, शिरडी या लहानशा गावी गोदातीरी आले नसते तर त्या भूमिला, त्या मूर्तींला व तेथील एकंदर **वातावरणाला** "मंगल रूप" आलेच नसते. म्हणूनच लेखक यांना असे वाटते :—

मंगल मंगल, त्रिवार मंगल ॥  
सारे मंगल, सारे हे मंगल ॥ धृ ॥  
मंगल क्षेत्र — मंगल धाम ॥  
मंगल तीर्थ — मंगल स्नान ॥  
मंगल मूर्ती — मंगल स्फूर्ती ॥  
मंगल पूजा — मंगल भाव ॥ १ ॥  
मंगल बुद्धि — मंगल विद्या ॥  
मंगल सेवा — मंगल मेवा ॥  
मंगल आरति — मंगल करिती ॥  
मंगल स्थान — मंगल मान ॥ २ ॥  
॥ मंगल-मंगल ॥

व म्हणूनच हे मंगलमय वातावरण या "**न्यारा संताचे**" बाबतीत का लागू पडले व भारतातूनच नव्हे तर जगाचे सर्व भागातून भक्त मंडळी श्री साईकडे का धाव घेऊ लागली हे एक प्रकारे **न्यारेच** नव्हे का ?

या महाराष्ट्र भूमीत व भारतातील प्रत्येक भागात अनेक नामांकित संत होऊन गेले व त्यांनी आपापले काळात योग्यप्रकारे "**जनसेवा**" केली. परंतु विसावे शतकात श्री साईबाबा हे अचानक "शिरडीत आले. प्रत्यक्ष पहाता ते १९ वे शतकाचे शेवटी शिरडीत आले व २० वे शतकात (१९१८) शिरडीत प्रसिद्धीस आले, राहिले, व जनसेवा केली म्हणूनच लेखकाने सुरवातीसच श्री साईबाबा हे विसावे शतकात शिरडीस अवतरले असे नमूद केले आहे. श्री साईबाबा हे ६० वर्षे शिरडीस होते व वयाचे २५ वे वर्षी शिरडीस दुसऱ्यांदा (प्रथम दर्शन वयाचे १६ वे वर्षी तत्पुरते) आले ते कायमचे व म्हणूनच या कलियुगात त्यांचे वय, आम्ही सर्व साधारण ८५ वर्षांचे समजतो परंतु ते वयाने किती होते त्याचे एका "न्यायालयातील" खटल्यावरून स्पष्ट दिसून येते की ते **खरोखरच** "न्यारे संत" होऊन गेले—तो खटला असा :—

एका चोराने चोरी प्रकरणी पकडले असता साक्ष देताना "मी निर्दोष आहे" असे स्पष्ट सांगितल्यावरून नामदार न्यायमूर्तींनी त्यास (चोरास) विचारले की "तू निर्दोष आहेस याचा **पुरावा–साक्ष** आहे का ? त्यावर तो चोर छाती ठोकून म्हणाला की माझा पुरावा-साक्ष फक्त "शिरडीचे साईबाबा" आहेत.

त्याप्रमाणे शिरडीचे श्री साईबाबांचे दरबारात न्यायालयीन कार्यालय (फूल बेंच) नेऊन या चोरी प्रकरणी न्यायमूर्तींनी जे प्रश्न श्री साईबाबांना विचारले त्यावरून लेखकास "श्री साईबाबा" हे "न्यारे संत" होऊन गेले असे वाटते. कारण प्रश्न **सरळ** परंतु उत्तर विचित्र निराळे—न्यारे.

प्रश्न — आपले नाव काय ?

उत्तर — लोक मला "साईबाबा" म्हणतात.

प्रश्न — आपण कोणत्या जातीचे ?

उत्तर — मानवता जातीचे.

प्रश्न — आपले वय किती ?

उत्तर — रामायण काळी मी राम होतो. कृष्ण काळात श्रीकृष्ण व आता मला "साईबाबा" म्हणतात. तेव्हा वय किती हे आपणच ठरवावे.

प्रश्न — असो ! ते सर्व ठीक आवे. प्रश्न एवढाच आहे की "हा चोर (चोराकडे बोट दाखवीत) म्हणतो की त्याने चोरी केली नाही व

याचा पुरावा साक्ष "शिरडीचे साईबाबा" आहेत. तर हे खरे आहे का ?

उत्तर — जगात चोरी कोण करीत नाही ? बाबा पुढे म्हणतात :—

"मुसाफीर जागते रहना
नगर में चोर आते है ॥
संभालो माल गठडीको
झपट पटमें उठाते हैं ॥
दिखाके मुरते सुंदर —
वो जालमें फँसाते हैं ॥

— तेव्हा या चोराने जर माझी साक्ष दिली असेल तर त्या "अल्लाची" तशीच मर्जी असावी.

या वरील प्रकारावरून लेखक म्हणतात :—

संतोमें न्यारा—शाने दुलारा ॥
रोशन सितारा—मेरे साईबाबा ॥ धृ ॥
कहाँसे आया था—किधर जानेवाला ॥
ना किसीसे था करतब ॥
ना औरोसें—मतलब ॥
खेल रचाया और—कुछ निराला ॥
परवर दिगारा—मेरे साईबाबा ॥ १ ॥
ये सिधे साधे तनको फटेले थे कपडे ॥
बरतन मिट्टीके ओर रोटी के तुकडे ॥
ओ मसजीद पुरानी — धुनी तुम्हारी ॥
है बेवरू का आसरा — मेरे साईबाबा ॥ २ ॥
कुछ नादानोंने इनसे बुरा खेल खेला ॥
पर ना हील गया उनसे यह शिरडीवाला ॥
कुछ करामत किया और नामे बढाकर ॥
चमकाके गया — यह शिरडीवाला ॥ ३ ॥
यह आलमका चक्कर जहाँतक चलेगा ॥
रगडा झगडा — तगडा भी रहेगा ॥
पर ना गिरनेवाला, ना झुकनेवाला ॥
साईका झंडा है लहरानेवाला ॥
करे दास काली तेरी हरबात दुआसें ॥
खाली न जाती — मेरे साईबाबा ॥ ४ ॥

## " समायिक सेवा "

श्री साईबाबा जरी ६० वर्षे शिरडीत राहिले तरी प्रत्यक्ष उन्नतीचा प्रसिद्धीचा काल फक्त सन १९१२ ते १९१८ या सात वर्षांचाच वाटतो. कारण " श्रीसाई-चमत्कार " जेव्हा भक्त मंडळींनी व विशेष करून शिरडीचे वाणी लोकांनी जेव्हा अनुभवले तेव्हा बाबांची महति " जनसमूहाला " पटली व बाबांना फशी पाडून बाबांना कोणीही तेल द्यायचे नाही हे नक्की करून सुद्धा बाबांनी " पाण्याचे दिवे " जाळले तेव्हा जनसमूह श्री साईंना प्रत्यक्ष शरण आला व म्हणूनच लेखक म्हणतात, अशा " न्याऱ्या संताचे " " स्वागत " कसे करावे :—

कैसे करु सत्कार तुम्हारा मैं ॥
कैसे करु सत्कार ॥ धृ ॥
दुनियामें जब जनम लिया ॥
तब जान लिया संसार ॥
चलते चलते — फिरते फिरते ॥
आ पडे शिरडी द्वार ॥ कैसे करु ॥
ग्राममें फिरकर देख लिया ॥
आपने लोग–विचार ॥
पानी की बत्ती जलाकर ॥
देखलाया सत्कार ॥ कैसे करु ॥
जातपातमें ध्यान नहीं था ॥
और धरम में – बिचार ॥
मानव सेवा – ईश्वर सेवा ॥
यही आपका – निरधार ॥ कैसे करु ॥
संत लोगमें नाम कमाया ॥
सेवा करी अपार — ॥
जन समूहको मार्ग पे रखकर ॥
खुद चले उस पार — ॥ कैसे करु ॥
दास काली कहे अब क्या बोलूं ।)
कृपा रखो — हम पर ॥
आपकी सेवा — ईश्वर सेवा ॥
यही हमारा — निरधार ॥ कैसे करु ॥

आणि यावेळेपासूनच " समादिक सेवा " करण्याचे बाबांनी ठरविले व सुरूही केले. कोणीही कोणत्याही ठिकाणाहून शिरडीस बाबांचे दर्शनास आला की– त्याची विचारपूस जात, भेद, वर्ण न मानता करावी व त्याचे दुःख निवारण करावे हेच बाबांनी अतिशय दयाळू अंतःकरणाने सुरू केल्यामुळे जो तो उठ की

जा शिरडीस. मी उच्च, मी नीच, मी हिंदु, मी मुसलमान, मी पारसी, किंवा इतर अस हा भेदभाव न मानता आपले दुःख " समायिक " आहे असे समजून श्री साईबाबा पुढे, सर्वांदेखत ठेवू लागला व तितक्याच तत्परतेने बाबांनी त्याचा " मोबदला " लोकास दिला व म्हणूनच श्री साईच्या भक्त मंडळीत सन १९१२ ते १९१८ या काल मर्यादेत आमूलाग्र वाढ होऊन जो तो बाबांना विनवू लागला :—

साई आलो तुमच्या द्वारा ॥
नका पाठवू — माघारा — ॥ धृ ॥
अवलोकूनिया माझ्या भावा ॥
द्यावी तुमची चरण सेवा ॥ १ ॥
जाणोनिया—मनोगता ॥
ठेवा माझे मस्तकीं हात ॥ २ ॥
दास म्हणे—कृपावंता ॥
चरणीं ठाव द्यावा आता ॥ ३ ॥

## संकट निवारण बाबा

याप्रमाणे प्रत्येक जण प्रत्येक जणास सांगू लागला — तू अडचणीत आहेस ? संकटात आहेस ? तर जगात कोणाचे नादी लागू नकोस. मंत्र-तंत्र, जादूटोणा, बोकड—कोंबडा वगैरेच्या भानगडीत पडू नको. सरळ शिरडीस जा व आपले संकट निवारण करून घे. याला दुजोरा म्हणूनच की काय श्री दासगणू महाराज यांचा मुंबईचा दौरा, कुलाबा जिल्हा व इतर ठिकाणी किर्तन-रूपाने " बाबांची महति " सांगितल्यावरूनच की काय, लोकांचे थवेच्या थवे शिरडीस जावू लागले. कारण दासगणू महाराज म्हणतात की, श्रीक्षेत्र पंढरपूर किंवा इतर क्षेत्री जाण्याची मुळीच जरुरी नाही, कारण " बाबा " हे आमचे " आद्य दैवत. "

येथेची पंढरपूर माझे ॥
शिरडी पंढरपूर माझे ॥
कसे म्हणावे दूर माझे ॥ धृ ॥
अणुरेणु व्यापुनी हा ॥
भरुनी असता ॥
कसे म्हणावे दूर माझे ॥
जाणे न लागे दूर माझें ॥
येथेची पंढरपूर माझे ॥

आणि दासगूण महाराजांचे " **किर्तनाचा** " परिणाम व्हायचा तोच झाला. भारतातून – सर्व भागातून लोक ( जनसमुदाय ) शिरडीस जावू लागला. पश्चिम,

मध्य, दक्षिण व उत्तर रेल्वे या सर्व ठिकाणाहून जो तो उठ, की जा शिरडीस. लेखक म्हणतात :—

परे मरे दरे उरे ॥
भारताची लेकरे ॥
प्रवास करिती सुखकरे ॥
साईनाथ —दर्शना ॥

## शिरडी ट्रेन

जो तो भक्त मुंबई गाठू लागला व बोरीबंदर स्टेशनहून त्याकाळी मनमाडहून जाणारी "कलकत्ता मेल" पकडू लागला. आज S. T. ने जाता येते. त्यावेळी तशी सोय नव्हती व म्हणूनच की काय — शिरडी ट्रेनचे कौतुक लेखक पहातात :—

बोरीबंदर—मशीदबंदर—भायखळा ॥
गाडी चाले—पुढे-परेल ॥
आले दादर — घाटकोपर ॥
गाडी गेली — ठाण्यावर ॥
पुढे चालली कल्याणासी ॥
गर्दी झाली हो गाडीसी ॥
वेगे वेगे — पुढे धावे ॥
भक्त मंडळी — मनासी बोले ॥
साईनाथ महाराज ॥ १ ॥
दया करा तुम्ही आम्हावरी ॥
गाडी चालली — इगतपुरी ॥
जाता जाता आले नाशिक ॥
भक्तांमध्यें कांहीं नास्तिक ॥
विचार करिती आपुलेसी ॥
गाडी चालली पुढे वेगेसी ॥
पुढे आले ते जंक्शन मनमाड ॥
गाडी थांबे — तेथे फार ॥
डबा काढला, कोपरगांवच्या गाडी जोडला ॥
गाडी निघाली मग वेगेसी ॥
नाम घेतसे श्री साईसी ॥
अल्ला—मालीक—मैया साई ॥
आम्ही येतो आपुले पायी ॥

गाडी पोहोचली — कोपरगांवी ॥
भक्त मंडळी उड्या टाकी ॥
बस स्टँडवरी जावोनी ।
लाईन लाविती धक्काबुक्की ॥
मोजही मोठी–तंटा भांडण ॥
मुळींच न करिती ॥
एक आवाजे " साई " स्मरति ॥
आणि म्हणती–साईनाथ महाराज ॥ २ ॥

मग प्रमाणे जो तो भक्त आपले संकट दूर करून घेणेसाठी शिरडी गाठू लागला व त्या भावनेनेच त्यास बाबांनी **फळ** दिले.

## व्यावहारिक बाबा

एवढा मोठा पसारा (भक्त मंडळीचा) शिरडीस येऊ लागला तरी बाबानी कधीही व्यवहार सोडला नाही. फकीर वेषात जरी रहात असत व सुरवातीस "**भिक्षाटन**" जरी करीत असत तरी त्यांचे प्रसिद्धी काळात त्यांनी जी कार्यें, जी जनसेवा केली, जे "**ज्ञानांजन**" भक्त लोकांचे डोळ्यात घातले, जे व्यवहार लोकांना दाखविले, शिकविले त्यावरून व श्रीयुत अण्णासाहेब दामोळकर, श्री. नानासाहेब चांदोरकर, श्रीमंत बुट्टी श्री. बापूसाहेब जोग, कॅप्टन हाटे, श्री. बाळासाहेब देव आणि इतर हजारो भक्त मंडळीना बाबांनी चमत्कार तर दाखविलाच, परंतु "पारमार्थिक व्यवहार" कसा करावा हे खास शिकविले. या विषयी "श्री साई सत्चरित्रात" संपूर्ण वर्णन केलेले आहे तरी या ठिकाणी लेखकास खालील उदाहरण भक्त मंडळीना समजणेसाठी द्यावे असे वाटते :—

श्री दासगणू महाराज उर्फ गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे हे सुरुवातीस "पोलीस खात्यात" फौजदार होते. परंतु जात्याच धार्मिक वृत्तीचे असल्याने त्यांची ओढ श्री पंढरीनाथाकडे होती व त्यांनी उत्तम वाङ्मय तयार केले. परंतु व्यावहारिक पाश संसाररुपी लावणीमध्ये सापडून त्यांना बरीच संकटे सहन करावी लागली. परम दयाळू बाबांनी त्यांना आपले चरणाजवळ आणविले व त्यांना "**व्यावहारिक**" "**जनसेवा**" कशी करावी ते शिकविले.

एका प्रसंगी ईशावास्याचा अभ्यास करीत असता दासगणूना शंका आली व त्या शंकेचे निवारण करून घेणेसाठी त्यानी बाबांचे जवळ **चरण स्पर्श** करून खाली पहात बसले. त्यावेळी बाबांनी त्यांना (दासगणूंना) विचारले की :—

गणू ! तू आज इतका उदास का दिसतोस ? काही अपरिहित असे काही घडले आहे का ! यावर श्री गणूदास म्हणतात — "बाबा" — या जगात जर भगवंत चराचरात भरला आहे तर एक अतिशय सुखी तर दुसरा अतिशय दुःखी

का ? गंगेचे अमृत मय "पाणी" आणि गटारीचे घाण "पाणी" यात तो परमेश्वर एक रूप आहे कारण गटारीचे पाण्यात उगविलेले "गुलाब" "कमल" गंगेच्या अमृतमय पाण्याने श्री ईश्वर मूर्तीस स्नान घालून त्यांचे डोक्यावर ठेवून पूजा करतात. मग अशा वेळी गटारीचे पाणी वाईट व गंगेचे पाणी चांगले असा भेदभाव का ? यावर बाबांनी काय उत्तर द्यावे ? लेखकांनी वर म्हटल्याप्रमाणे बाबा हे "न्यारे संत" आहेत हे त्यांचे खालील उत्तरावरून दिसून येते.

बाबा म्हणतात — गणू ! तुला याचे उत्तर हवेच का ? इतका सुशिक्षित वाङ्मयपटू ! तुला एवढे ध्यानात येत नाही का ? बाबा पुढे म्हणतात—

अल्ला मालीक भला करेगा ॥
सब दुनियाका भला करेगा ॥ धृ० ॥
काहे को मगरुरी करता है तो ॥
कच्ची मटीका बंगला तेरा ॥
पाव पलक में गिरता है तो ॥ १ ॥
मुल्ला होकर बांग पुकारे ॥
वो भी "अल्ला" सुनता हैं तो ॥ २ ॥
और-किडीके पांव में घुंघरु बजत है ॥
वो भी "अल्ला" सुनता है तो ॥ २ ॥

गणू ! खरोखरच तुला तुझ्या प्रश्नाचे उत्तर पाहिजेच का ? गणूदासांना फार आनंद झाला व आश्चर्यही वाटले व म्हणूनच की काय बाबांचे चरणावर मस्तक ठेवून विनंती केली :—

बाबा आपणच माझ्या प्रश्नाचे स्पष्टीकरण करून उत्तर द्यावे असे मला वाटते.

यावर बाबा म्हणाले ... तूं मुंबईस केव्हा जाणार ?

बाबांचे विचित्र उत्तर ऐकून गणूदासांना आश्चर्य वाटले ! परंतु अति आज्ञाधारक सेवक ते असल्याने म्हणाले ... बाबा ! का ? आपण हुकूम कराल तर आजच जातो. यावर बाबा हंसले व म्हणाले — जा ! जरूर जा ! पार्ले येथे "काका" दिक्षितांकडे मुक्काम कर — तुझ्या विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर तेथे मिळेल. यावर गणूदास विचारात पडले व म्हणाले, काय ? काका दिक्षित उत्तर देतील ? त्यावर बाबांनी स्पष्ट खुलासा केला :—

नाही — त्यांची मोलकरीण. तुझ्या प्रश्नाचा उलगडा करेल. याबर गणूदासांना काहीच बोलता आले नाही व स्वःताशीच पुटपुटले ! बाबा मस्करी करतात व काहीतरी वेळ मारून नेण्यासाठी मला मुंबईस पाठवीत आहेत ! यावर बाबांनी पुन्हा स्पष्ट बजावून सांगितले की — जर तुझे समाधान काका दिक्षितांची

"मोलकरीण" करू शकली नाही तर तिला घेऊन तू शिरडीस ये.

या एकंदर प्रकारावरून दासगणू अकल्पित मुंबईस "पार्ले" येथे "सॉलिसिटर एन्. सी. उर्फ काका दिक्षितांकडे आलेले पाहून काकांना फार आश्चर्य वाटले व त्या बरोबरच आनंदही वाटला. परंतु दासगणूंना "**चिंताग्रस्त**" पाहिल्यावरून त्यांनाही मोठे कोडे पडले. विचारावे का — न विचारावे ? या भ्रमात काका असतानाच गणूदास म्हणाले मी येथे तीन चार दिवस रहाणार आहे. मला एकांतात "ईश पूजन" करावयाचे आहे काकांना "याचा" काहीच अर्थ समजला नाही. परंतु गणूदासांचे "इच्छे प्रमाणे" त्यांना वरील मजल्यावर स्वतंत्र व्यवस्था करून दिली व पुढे काय "चमत्कार" होतो त्याची वाट पहात बसले.

प्रथम दिवस अशांत वातावरणात गेला. नित्य नियमाप्रमाणे गणूदासांनी रात्रौ श्री सद्गुरु साईबाबांचे **प्रतिमेची** पूजा आरती केली परंतु अस्वस्थ **मन** असल्याने नेहमीप्रमाणे ते (गणूदास) दर्शनासाठी आलेल्या भक्त मंडळीशी मनमोकळे बोलू शकले नाहीत. रात्रौ, मध्यरात्र उलटून गेल्यावर सुद्धा त्यांना झोप आली नाही. काकांची मोलकरीण तुझ्या प्रश्नाचा उलगडा करेल हे "**एकच वाक्य**" त्यांचे डोळ्यासमोर नाचत होते — व अशाप्रकारे पहाट झाली व एक "मंजूळ स्वर" त्यांचे कानावर पडला. मोठ्या आश्चर्याने त्यांनी खिडकीतून वाकून पाहिले तो एक लहान ८-१० वर्षांची मुलगी काकांचे वाड्याचे मागील भागात भांडे घाशीत आहे असे त्यांना दिसले.

गणूदास खाली आले व त्यांनी त्या मुलीची विचारपूस केली. सदर मुलगी काकांचीच मोलकरीण आहे असे समजताच व तिचे ते **मंजूळ गाणे** "नारंगी साडी" वरचे दास गणूचे "ईश स्तुतीचे" कोडे सोडवण्याचेच आहे असे दास गणूंना वाटल्या वरून व त्या मुलीची परिस्थिती गरीब, अंगावरचे फाटके कपडे वगैरे पाहून गणूदास गहिवरून गेले व त्यांनी काकांकडून तिला "नारंगी रंगाचा" एक साडी जोड देवविला व आता हेच नेसत जा असे सांगितले.

परंतु आश्चर्याचा धक्का गणूदासांना दुसरे दिवशी बसला. कारण ती मुलगी पूर्ववत जुन्या कपड्यामध्येच परंतु तिचे मनावर पूर्वीप्रमाणेच आनंदाची छाया. त्यामुळे गणूदासांनी त्या मुलीला विचारले की :– तुला नवीन साडी दिली ती तू का नेसली नाहीस ? का तुला ती आवडली नाही ? यावर त्या मुलीने अतिशय स्पष्ट शब्दात गणूदासांची समजूत घातली.

बाबा-बाबा–तुम्हाला वाईट वाटले का ? तुम्हाला वाईट वाटण्याचे काहीच कारण दिसत नाही. कारण या जगात ज्या ज्या वस्तू आहेत त्या सर्व नवीनच आहेत का ? माझे अंगावरील कपडे (फाटके) एके काळी नवीनच होते व तुम्ही

दिलेली साडी-ती सुद्धा एक दिवशी जुनी-जीर्ण होणारच! तेव्हा त्यात वाईट वाटण्याचे कारण उरतच नाही. कारण :—

बाबा, या जगात चराचरात "सुख" भरलेले आहे. दुःख मानणेवर आहे. बाबा, सुख व दुःख दोन्हीही सारखेच आहे कारण—

"हेही पूर्ण तेही पूर्ण ॥
पूर्णातूनी निघाले पूर्ण ॥

अपूर्ण असे काही या जगामध्ये सांगण्यासारखे असते तर, "सूर्य, चंद्र, तारे, वायु, तेज व आकाश" यानी आपापली कामगिरी केलीच नसती. तेव्हा माझे जुने कपडे काय व हे नवीन लुगडे काय...दोघांचीही किंमत एकच.

यावर दास गणूंचे डोळयात "स्पष्ट ज्ञानांजन" श्री सद्गुरु बाबांनी घातले व या चिमुरड्या मुलीचे मुखातून ईश्वरस्तुतीचे कोडे उलगडवले हे पाहून दासगणूंना जो अत्यानंद झाला त्याचे वर्णन "शब्दात" करणे फार कठीण आहे. मी ब्राह्मण उच्च जातीचा, ही पोरगी कुणबी-नीच जातीची हा "उच्चनीच" भाव विसरून दासगणूनी एकदम गहिंवरून जाऊन त्या मुलीला एकदम उचलून घेतले आणि आपले गळयाशी घट्ट लावले. त्यांचे डोळयातून "आनंदाश्रू" घळघळले व म्हणाले-मुली-तू मजबरोबर शिरडीला चल. काका दिक्षीतांना वरील एकंदर प्रकार ध्यानात आला व ईशरुपी बाबांचे वर्णन कोणत्या शब्दात करावे असे त्यांना वाटले.

लेखक म्हणतात :—

"साईबिना कुछ चीज नहीं है ॥
साई बिना कोई देव नहीं है ॥ ध० ॥
उपर साई-निचे साई ॥
सब दुनिया में-साई भरा है ॥
अंदर साई-बाहर साई ॥
अनला नलमें भी भरा है ॥ १ ॥
सगुण साई-निर्गुण साई ॥
साई दो के पैल तरफ है ॥
मालिक साई-मैया साई ॥
डरने का कुछ काम नही है ॥ २ ॥

## "निर्गुण-निराकार बाबा"

हजारो भक्त बाबांचे दर्शनास दररोज शिरडी येथे जातात. प्रत्येक गुरुवारी श्री साईसमाधि मंदिरात बाबांना अभिषेक करतात. तसा दररोज पूजापाठ अभिषेक होतोच परंतु "गुरुवारची मौज" काही और वाटते व म्हणूनच भक्त मंडळी

आपापली दुःखे कमी करून घेणेसाठी सर्व जातीचे, सर्व क्षेत्रातील लोक एक दिलाने – एक मुखाने निर्गुण निराकार बाबांचे वर्णन करताना लेखकास वाटते :—

हासत नाचत जावू चलारे ॥
डोळे भरूनी शिरडीची ती
द्वारका माता पाहू चला रे ॥ धृ ॥
सांब भोळा — हा शिरडीचा ॥
साधी लक्तरे — वाली दिनांचा ॥
श्रद्धा आणि — विश्वासाने ॥
ध्येय आपुले गाठू चलारे ॥ हासत–नाचत ॥
संगत खोटी — निंदा झुटी ॥
चाल उलटी — करीते माती ॥
जैसे करी जो — तैसे भरी तो ॥
खुणगाठ आपुल्या ध्यानी धरा रे ॥ हासत नाचत ॥
साईनाथा पुढे नाचीन मी या ॥
नाचून रिझविन भक्तांना या ॥
संसारातून — परमार्थाची ॥
दास कालीने — धरली कास रे ॥ हासत नाचत ॥

वर प्रमाणे हजारो भक्तांबरोबर लेखकही **लीन** होऊन या वर्षी श्री सद्‌गुरु साईबाबांचे "पुण्यतिथी" निमित्त बाबांची पूजा करून "**मागणे**" घालून हा लेख पुरा करीत आहे :—

॥ हार गजरे वाहू — साईला हार गजरे वाहू ॥ धृ ॥
बुद्धि चमेली — गुलाब मन ते ॥
जाई मोगरा — काम गुंते ॥
ऐशा गुंफोनी — सुमन हराला ॥
पूजेला नेऊ — साईच्या पूजेला नेऊ ॥ हार गजरे ॥
तप चंदन ते — क्षमा अक्षता ॥
क्षम दम साधन — तुळशी बुक्का ॥
नैवेद्य असे तो — मुग्ध आता ॥
भक्ति विडा ठेवू — साइला भक्ती विडा ठेवू ॥
॥ हार गजरे ॥

साईनाथ पुजु — करू प्रार्थना ॥
मागतसे वर — प्रसाद द्यावा ॥

ऐसा वर तू देई आम्हा ॥
पदि लीन होऊं — साईच्या पदि लीन होऊ ॥ हार गजरे ॥
साईनाथ पुजू करू विनंती ॥
मागतसे वर — पुढता पुढती ॥
किती "सुंदर" ही प्रभू तव मूर्ती ॥
**मम अंतरी** राहूं — साईला हारगजरे वाहू ॥ हार गजरे ॥


# • संत मासिकांचा सम्राट •

# श्रीसाईलीला दीपोत्सवी अंक १९७४

- श्रीसाईभक्तांची श्रद्धास्थाने या माहितीपूर्ण लेखमालेत लंडनचे श्रीसाई मंदिर.
- संतश्रेष्ठ श्रीसाईबाबांच्या सहवासातील आजचे संत श्री. कमूबाबा यांची रंजक मुलाखत.
- संतश्रेष्ठ श्रीसाईबाबा आणि नटश्रेष्ठ गणपतराव बोडस एक खुसखुशीत लेख.
- लो. टिळकांचे राजकीय सल्लागार कै. दादासाहेब खापर्डे यांची अविस्मरणीय शिरडी भेट.
- रिझर्व्ह बँकेचे भूतपूर्व गव्हर्नर श्री. बी. एन. आडारकर यांची श्रीसाईभक्ती.
- शिरडी संस्थानचे रिसिव्हरसाहेब श्री. का. सी. पाठक यांना प्रत्यक्ष श्रीसाईबाबा भेटून गेले ! आणि...शंभर टक्के सत्य घटनेवर आधारित वाचनीय लेख.
- श्री. र. श्री. पुजारी लिखित–श्रीसाईनाथ ललित चरित्र लेखमाला.
- होरालंकार श्री. शं. बा. देवधरांची वाचकांना आवडलेली ज्योतिषविषयक लेखमाला, याशिवाय अनेक साईभक्तीपर कविता, साहित्य दर्शन, शिरडी वृत्त.
- भेटीगाठी या सदरात श्रीसाई चित्रकार स. कृ. काळे.

**मुखपृष्ठावर श्रीसाईबाबांचे संग्राह्य असे दुर्मिळ चित्र**

## श्री साईबाबांना प्रत्यक्ष पाहिलेले चोपदार

# श्री. आप्पा बाळाजी भालेराव

• सदानंद चेंदवणकर

शिरडीच्या समाधी मंदिरातील बाबांच्या प्रत्येक आरतीच्या शेवटी भालदार चोपदारांकडून " ॐ राजाधिराज योगिराज परब्रह्म श्रीसच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज " अशी ललकारी दिली जाते. ही ललकारी संपल्यावर भक्तगण मोठ्या संख्येने समाधिस्थानाला शिरसावंद्य प्रणाम करण्यासाठी एकच गर्दी करतात. त्यांना " चलो चालो चलो " असे खड्या आवाजात नम्रपणाने विनंती करणाऱ्या एका तांबडे कपडे, तांबडी पगडी व हातात चांदीची मूठ असलेला राजदंड घेतलेल्या चोपदाराकडे नवख्या भाविकाचे लक्ष वेधून रहाते. हा खड्या सुरात दर्शन घेऊन लौकर निघा असे सुचविणारा वयोवृद्ध चोपदार आहे आपला आप्पा बाळाजी भालेराव. ' आप्पा ' म्हणूनच सारे जान पहचानीचे भाविक त्यांना हाक मारतात.



श्री. आप्पा बाळाजी भालेराव

या आप्पांचं वय किती आहे माहित ! सत्तरीच्यावर. संतचूडामणि भगवान श्री साईबाबांना यांनी पाहिलं आहे, आणि ते पण या शिर्डीतच. आप्पांना कुठं मिसरूड फुटू लागली होती नव्हती तेव्हापासून त्यांना बाबा चांगले आठवतात. आप्पांचे वडील बाळाजीपंत, शिरडी खेड्यात सुतारकी करीत असत. आप्पांचा जन्म येथलाच. ते शिरडी सोडून अद्यापपर्यंत कुठेच गेले नाहीत. अजून मुंबईसुद्धा त्यांनी पाहिली नाही. असंख्य भाविक त्यांना ' आमचेकडे या, आमचेकडे या ' म्हणून सांगतात पण आप्पा बाबांच्या चरणाची सेवा सोडून कुठेच जात नाहीत व गेले नाहीत. त्यांचं शिक्षण शिरडीच्या ग्रामपंचायतीच्या शाळेत जेमतेम सहा–सात बुकापर्यंत झालं. लहानपणापासूनच यांचा ओढा ईश्वरी वाङ्मयाकडे होता. गीता ज्ञानेश्वरीचं त्यांनी चांगलं वाचन केलेलं आहे. भगवद्गीतेतला अकरावा अध्याय तर त्यांना मुखोद्गत आहे. शिरडीमध्ये बाबांच्या दर्शनास येणाऱ्या आणि आता समाधिमंदिराला भेटी देणाऱ्या

कितीतरी ख्यात विख्यात आणि नामवंतांना त्यांनी गेल्या साठ वर्षात पाहिलेलं आहे. हे खरोखरच त्यांचं मोठं सद्भाग्य म्हटलं पाहिजे. लोकमान्य टिळक आणि त्यांचे राजकीय सल्लागार श्री. दादासाहेब खापर्डे यांनाही त्यांनी जवळून पाहिलेलं आहे. शेगावचे श्री गजाननमहाराज, साकुरीचे श्री उपासनी बाबा, संतशिरोमणी श्री गाडगे बाबा, बंकट स्वामी, तपकिरे महाराज, तनपुरे महाराज, सोनोपंत दांडेकर इ. अनेकांचे त्यांनी दर्शन घेतलेले आहे.

श्रीसाईबाबांचा शिरडीत जयजयकार चालू असता आप्पा बाबांच्या सहवासात जे आले, ते अगदी आजतागायत ते त्यांची सेवा करण्यातच रमलेले अहेत. खुद्द बाबा त्यांना 'आप्पा' याच प्रेमळ नावाने हाक मारीत असत. बाबांच्या प्रत्येक कार्याला आणि सकाळ-संध्याकाळच्या आरत्यांना आप्पा आजवर हजर रहात आलेले आहेत.

१९३४ सालची गोष्ट. श्री. भास्कर रघुवीर पुरंदरे यांना एक साक्षात्कार झाला की आप्पाना समाधिमंदिरात चोपदार करावे. श्री. पुरंदरे हे तत्कालीन शिरडी संस्थानचे एक व्यवस्थापक होते. त्यावेळी आप्पांचा मोठा भाऊ आत्माराम बाळाजी भालेराव, नाना तुकाराम शिंदे, बाळ काशीराम शिंपी, नाना वामन कुलकर्णी ही मंडळी समाधि मंदिरात नोकरीस होती. परंतु शिंपी आणि कुलकर्णी हे दोघे जण आपल्या सोपविलेल्या कामात चुकारपणा करू लागले. कुलकर्णी तर बाबांचे काम टाकून तमाशाला जाऊन बसू लागला. तेव्हा तत्कालीन व्यवस्थापकांनी वेळोवेळी समज देऊनही ही मंडळी जेव्हा ऐकेनात तेव्हा त्यांना जबाबदारीतून मुक्त करून त्यांच्या जागी अप्पांची १९३४ साली नेमणूक केली. तेव्हा पासून तो आजतागायत अप्पा चोपदार आहेत. आज चाळीस वर्षे हेच काम करीत आहेत. त्यावेळी अप्पांना पगार अगदीच मामुली होता. १९४० साली पगार अवघा तीन रु. झाला, १९५२ मधे पाच रु., १९५५ मधे आठ रु., १९६० साली आठ रु. आणि मग जो वाढत गेला तो आज पावणे तीनशेवर स्थिरावला आहे.

आप्पा आज काहीसे थकलेले दिसले तरी ते वयोमानाप्रमाणे म्हणता येईल. पण तरुणपणात त्यांची प्रकृती चांगली दणकट होती दूध, बदाम व मोसंबीचा रस या पदार्थांचे त्यांनी भरपूर सेवन केलेले आहे. त्यांच्या पहिल्या कुटुंबाचे नाव भिकूबाई. यांना दोन मुली झाल्या. पहिले कुटुंब गेल्यावर त्यांनी दुसरा विवाह बऱ्याच वर्षांनी केला. त्यांच्या दुसऱ्या कुटुंबाचे नाव सुमनताई. तिने एक मुलगी-छाया आणि एक मुलगा-प्रकाश ही अप्पांच्या भालेराव कुटुंबाला दिली आहेत. आज अप्पा आपल्या संसारात आणि श्री बाबांच्या सेवेत दंग आहेत. त्यापलिकडे त्यांना सिनेमा, नाटक, तमाशा यापैकी कसले कसलेच म्हणून व्यसन नाही. आपल्या फावल्या वेळात ते थोडे बहुत ज्योतिष मात्र सांगतात व त्यासाठी विश्वासू भक्तांचा त्यांच्या भोवती त्यांच्या फावल्या वेळात गराडा असतो.

● ● ●

# फलज्योतिषाचा श्रीगणेशा ( ओनामा )

[ ले. होरालंकार शं. वा. देवधर, दादर, मुंबई १४. ]

## आपले भविष्य आपल्या जन्मराशीवरून कसे पहावे.

### लेखांक २ रा

मागील लेखात स्थूलमानाने आपण राशींची शारीरिक व मानसिक लक्षणे पाहिली. प्रत्येक माणसाला आपले पुढील भविष्य समजावून घेण्याची तीव्र उत्कंठा असते. आणि म्हणूनच आपण वर्तमानपत्रातून अगर मासिकातून वर्तविलेली भविष्ये उत्सुकतेने चाळीत असतो. आपली जन्मरास आपल्याला माहीत असली तर ठीकच, नाहीतर आपल्या नामाक्षरावरून असलेली नामरास पाहून आपले भविष्य समजू शकेल. जन्मनाव अगर चालू नावाचे आद्याक्षर यावरून आपली राशी खालील प्रमाणे निश्चित करावी व पुढे दिलेली पद्धति नीट मनन करून स्वतःचे भविष्य पाहावे.

| नावाची आद्याक्षरे | राशी |
|---|---|
| चू, ल, आ Chu L. A. | मेष |
| इ, उ, ए, ओ, व. E. U. O. V. | वृषभ |
| क, घ, छ, ह. K. Gh, Chha, H. | मिथुन |
| ही, हू, हे, हो, ड. H. D. | कर्क |
| म. ट. M. T. | सिंह |
| टो, प, ष, ण, ठ, T, P, N, Tha | कन्या |
| र, त, R. T. | तूळ |
| तो, न, य. N. Y. | वृश्चिक |
| ये, यो, भ. ध, फ, ढ. y, Bha, Dha, Pha | धनु |
| भो, ज, ग, ख J. Kha, G | मकर |
| गू, गे, गो, स, दा. G. S. D | कुंभ |
| दी, दे, दो, च, थ, झ, चा, ची Di, De, Do, Cha, Tha, Chi | मीन |

यावरून नावावरून आपली राशी ध्यानात येईल.

जन्मकुंडलीप्रमाणे सबंध आयुष्यात कोणत्या गोष्टी व्हावयाच्या हे निश्चित ठरलेले असते. ते योग केव्हा येतील हे ज्ञान आपल्याला चालू ग्रहांवरून समजावून

घ्यावयाचे आहे. आयुष्यात संततिप्राप्तीचा योगच नसेल तर चांगला गुरु येऊनही संतति प्राप्ती होईलच असे नाही. किंवा अचानक द्रव्यलाभाचा योग जन्मपत्रिकेत असल्यास तो केव्हा येईल हे चालू ग्रहावरून समजू शकेल. चालू ग्रहानांच 'गोचर ग्रह' असे म्हणतात.

प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यात चांगल्या वाईट गोष्टी घडत असतात. या गोष्टीचे भविष्य आगाऊ कळावे अशी प्रत्येकाची इच्छा असते. मुख्यत: सांपत्तिक स्थिति, आरोग्य, नोकरीधंदा, स्त्री-सौख्य, संतति, मानमान्यता ह्याच त्या गोष्टी आहेत. प्रथमतः वरील गोष्टी घडण्यास कोणते ग्रह कारणीभूत होतात ते समजणे आवश्यक आहे.

सांपत्तिक स्थिति — गुरु, शुक्र
शरीर व मनाची स्थिति — रवि, चंद्र
स्त्रीसौख्य व सांसारिक स्थिति — शुक्र
संतति, विद्या, बुद्धि, — गुरु, बुध
सन्मान, नोकरी, अधिकार — रवि, गुरु, शनि
धाडस, पराक्रम, धडाडी — मंगळ

जननकाळी जो ग्रह चांगला असतो तो गोचरीने शुभ आला तर शुभ परिणाम घडेल. शिवाय प्रत्येक राशीला कोणते ग्रह लाभदायक अगर योगकारक असतात तेही प्रत्येकाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे. मेष राशीला शुक्र शनि, वृषभेला बुध गुरु, मिथुनेला चंद्र मंगळ, कर्केला रविशुक्र, सिंहेला रविबुध, कन्येला शुक्र चंद्र, तूळेला मंगळ-रवि, वृश्चिकेला रविमंगळ, धनुला शनिशुक्र, मकरेला शनिमंगळ, कुंभेला गुरु व मीनेला शनिमंगळ या ग्रहांचे **सांपत्तिक स्थिति** अनुकूल असण्याकरिता पाठबळ असणे आवश्यक आहे.

सर्व साधारणपणे चंद्र, बुध, गुरु, शुक्र हे शुभग्रह व रवि, मंगळ, शनि-राहू, केतु हे पापग्रह मानले जातात.

गोचर ग्रह पाहाणे म्हणजे आपल्याला चालू ग्रह कसे आहेत ते जाणणे. अर्थात चालू ग्रह कोणत्या राशीत आहेत ते पंचांगावरुनच कळते. पंचांगात कोणता ग्रह कोणत्या दिवशी बदलतो. ते दिलेले असते. हे वृषभेर्कः, धनुषि गुरुः, मिथुने भौमः या प्रमाणे लिहितात. दर पंधरवड्याचे अखेरीस सूर्योदयाच्या वेळची कुंडली मांडलेली असते त्या कुंडलीवरून त्यावेळी कोणता ग्रह कोणत्या राशीला आहे ते सहज समजू शकते. समजा माझी मिथुन रास आहे व चालू गुरु ह्या महिन्यात कुंभ राशीत आहे. मिथुन म्हणजे ३ व कुंभ म्हणजे ११ तीन पासून अकरा पर्यंत म्हणजे नववा गुरु आहे. तो अर्थात शुभ फल देणारा आहे. मोजताना आपली रास धरून मोजण्यास सुरवात करावी. व ज्या राशीत गोचर ग्रह आहे त्या राशीपर्यंत मोजावे म्हणजे तो ग्रह कितवा आला आहे ते कळू शकेल.

आणखी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की राशीवरून मिळणारी फल ही सामान्यस्वरूपाची, कोणते परिणाम घडतील त्याचे स्वरूप दर्शविणारी व स्थूल स्वरूपाची असतात. जन्मकुंडलीच्या मूळच्या ग्रहयोगांची जी निश्चित फले असतात त्या फलाला अनुसरूनच्च ही राश्यात्मक फले पाहिली पाहिजेत,

दुसरी एक गोष्ट ध्यानात ठेवली पाहिजे की व्यक्तीचे साधारण दोन वर्ग पडतात. ज्यांच्या आयुष्यात सतत घडामोडी व उलथापालथ होत असते असे व ज्यांचे आयुष्य बरेचसे स्थिर असून ठराविक साचेबंद पद्धतीने चाललेले असते व वर्षावर्षामध्ये त्यांच्या जीवनात विशेष काही फरक पडत नाही असे. ज्यांच्या आयुष्यात स्थिरत्व नाही व हालचाली आहेत त्यांच्या जन्मकुंडलीत मंगळ, गुरु, रवि, चंद्र हे परिणाम करणारे ग्रह प्रभावी असतात व ज्यांचे आयुष्य स्थिर आहे अशांच्या पत्रिकेत शनि, हर्शल, नेपच्युन व राहू यांचे परिणाम विशेष झालेले आढळतात.

कोणते ग्रह शुभ व कोणते अशुभ समजले जातात हे आपण पाहिले. आता प्रश्न असा आहे की त्याची फळे काय मिळणार ? शुभाशुभत्वाचे परिणाम राशीपरत्वे माणसास काय भोगावे लागणार हे समजणे महत्त्वाचे आहे. विशिष्ट प्रकारे वाईट परिणाम होणार असे समजल्यानंतर मनाची तशी तयारी करता येईल. ग्रहांचे परिणाम सर्वांवर सारखेच्च होणार असले तरी ते परिस्थितिसापेक्ष असतात. समजा धननाशक शनि आला तर तो गरिबास जितका जाचक होईल तितका श्रीमंतास होणार नाही हे उघड आहे. परंतु मृत्युयोग आला तर तो दोघांसही अटळ ठरेल यात शंका नाही. श्रीमंतीमुळे त्याचे आयुष्य वाढणार नाही किंवा गरिबीमुळे ते हटणारही नाही हे निश्चित.

कोणता ग्रह जन्मराशीप्रमाणे कोणत्या स्थानात आला म्हणजे तो शुभ व कोणत्या स्थानात आला म्हणजे अशुभ हे आता स्थूलमानाने आपण लक्षात घेऊ.

स्थूल मानाने रवि, मंगळ, शनि, राहुकेतू हे पापग्रह ३, ६, १०, ११ ह्या स्थानात आले असता शुभ फल देणारे असतात व बाकीच्या स्थानात ते अशुभ फले देणारे असतात. ह्या अशुभ ग्रहासंबंधी एक सामान्य नियम सांगता येईल.

**रवि** — जन्मराशीपासून तिसरा, सहावा, दहावा व अकरावा आला असता शुभ फल देतो.

**चंद्र** — जन्मराशीपासून पहिला, तिसरा, सहावा, दहावा आला असता अनुक्रमे अधिकाधिक शुभ फले देतो. दोन, पाच, सात, नऊ ह्या स्थानातील चंद्र शुभ फले देतो असे मानतात.

**मंगळ** — जन्मराशीपासून तिसरा, सहावा, दहावा व अकरावा आला म्हणजे क्रमाक्रमाने जास्त जास्त शुभ फल देणारा असतो.

**बुध** — जन्मराशीपासून पहिला, दुसरा, तिसरा, चौथा सहावा, आठवा, दहावा, अकरावा व बारावा याप्रमाणे आला असता तो शुभ फल देण्यास पूर्ण बलवान असतो.

**गुरु** — जन्मराशीपासून दुसरा, पाचवा, सातवा, नववा व अकरावा याप्रमाणे आला असता संकटे नाहीशी करतो व शुभ फल प्राप्त करून देतो.

**शुक्र** — जन्मराशीपासून पहिला दुसरा, चौथा, पाचवा, आठवा, नववा, अकरावा व बारावा आला असता शुभ फल देतो.

**शनि** — जन्मराशीपासून तिसरा, सहावा, दहावा व अकरावा असा आला असता फार भरभराटीचा काळ प्राप्त करून देतो व शुभ फल उत्पन्न करतो.

**राहु--केतू** — हे ग्रह शनिप्रमाणेच त्या त्या ठिकाणी आले असता शुभ फल देतात.

वर सांगितल्या स्थानाखेरीज बाकीच्या ठिकाणी ज्यावेळी ग्रह येतात त्यावेळी ते अशुभ फलदायक व त्रासदायक होतात असेच समजावे. रवि, चंद्र, शुक्र यांचे परिणाम अल्पकाल टिकतात परंतु गुरू, शनि, राहु यांचे परिणाम बरेच दिवस भोगावे लागतात. साधारणपणे त्यांची मुदत एका राशीत खालीलप्रमाणे असते.

चंद्र २१ दिवस, मंगळ १॥ महिना, बुध १ महिना. गुरू १३ महिने शुक्र १ महिना, शनि २॥ वर्षे, राहु--केतू १॥ वर्षे. हर्षल ७ वर्षे, नेपच्युन १४ वर्षे. याप्रमाणे काल असतो. गतिप्रमाणे कमी जास्त वेळ लागतो.

आता आपण जन्मराशीपासून प्रत्येक ग्रहाची शुभाशुभ फले कशी मिळतात, त्याचे विवेचन करू.

## शनीची शुभाशुभ फले

शनि जन्मराशीपासून बारावा, पहिला व दुसरा म्हणजे साडेसाती असे समजतात. साडेसातीत अनेकांना अनेक प्रकारे त्रास भोगावा लागतो. कित्येकाना आर्थिक अडचणी, उद्योगधंद्यात नुकसान, आजारीपण, तर कित्येकाना कारागृहवास भोगावा लागतो. साडेसातीचा परिणाम होऊन ती भोवली नाही असा मनुष्य विरळा. ज्योतिषशास्त्राची सत्यता साडेसाती पटवून देते. आता जन्मराशीपासून प्रत्येक स्थानी शनि आला असता त्याचे फळ काय मिळते ते पाहू.

(१) जन्मराशीपासून पहिला शनि येईल तर शरीरास आजार उत्पन्न होतील. विशेषतः मस्तकाला पीडा होईल. पत्नीलाही आजार उत्पन्न होईल. मनस्वास्थ्य रहाणार नाही.

(२) जन्मराशीपासून शनि दुसरा आल्यास कुटुंबामध्ये अगर नातेवाईकांमध्ये आजार व मृत्यू, कर्जबाजारीपणा व व्यवसायाला उतरती कळा लागते.

( ३ ) जन्मराशीपासून तिसरा शनि आला असता उद्योगधंद्यामध्ये प्रगती होईल शत्रूवर विजय मिळेल. द्रव्यदृष्ट्या अनुकूल गोष्टी घडतील. परिस्थितीत एकदम फरक पडेल. आपल्या इच्छित कार्यात यश प्राप्त होईल. मोठमोठी कार्ये सिद्ध होतील.

( ४ ) जन्मराशीपासून चौथा शनि येईल तर मातापित्यास अनिष्ट ठरेल. जमीनजुमला व घरदार असणाऱ्याना नुकसानकारक. मनाची स्थिती असमाधानी राहील.

( ५ ) जन्मराशीपासून पाचवा शनि आल्यास संततीला त्रासदायक होईल. स्त्रियांना गर्भपाताची भीती राहील. खर्च वाढेल. मनात निराशा उत्पन्न होईल. खोटे आळ येतील.

( ६ ) जन्मराशीपासून शनि सहावा आला असता आलेल्या संकटातून मुक्त होईल. उद्योगधंद्याची भरभराट होईल. पण लोकांमध्ये अनादर वाढेल.

( ७ ) जन्मराशीपासून सातवा शनि आल्यास व ग्रह वाईट असल्यास पत्नीवियोग होईल. दुसऱ्या देशात प्रवास करण्याची वेळ येईल. सांधेदुखीचा विकार निर्माण होईल. विद्येमध्ये अडथळे उत्पन्न होतील.

( ८ ) जन्मराशीपासून आठवा शनि असल्यास आप्तेष्टांपासून त्रास होईल. नैराश्य उत्पन्न होईल. लोकापवाद निर्माण होतील. प्रिय नातेवाईकांचा वियोग होईल. दुर्बुद्धि निर्माण होईल.

( ९ ) जन्मराशीपासून नववा शनि असल्यास शत्रूपासून त्रास उत्पन्न होईल. त्यामुळे प्रवास घडेल. इच्छित कार्याचा नाश होईल. आरोग्य बिघडेल. निष्कारण अपमान होईल. धर्माकडे व ईश्वराकडे लक्ष लागेल.

(१०) जन्मराशीपासून दशमात शनि असल्यास जमीनजुमल्याचे बाबतीत व घरदार वाहने वगैरे बाबतीत सुख मिळते. कीर्ती वाढते. पण मनस्थिती असमाधानकारक असते.

( ११ ) जन्मराशीपासून अकरावा शनि आला असता प्रतिष्ठा व कीर्ती यांची वाढ होते. आर्थिक लाभ होतात. नोकराचाकरापासून फायदा होतो. उच्च दर्जा प्राप्त होतो. आपल्या मनातील इच्छा पूर्ण होतात. अकरावा शनि सर्वात लाभदायक आहे.

( १२ ) बारावा शनि म्हणजेच साडेसाती. हा शनि संकटे निर्माण करतो. पैशाचा अवास्तव खर्च होतो. कोर्ट दरबार करावे लागतात. आजार, भांडण, तंटे आप्तेष्टांचा विरोध इ. गोष्टी उत्पन्न होतात.

शनीची पीडा निवारण होण्यासाठी "नीलमणी" हे रत्न वापरावे. ( Biue supphire )

• • •

# श्री साईनाथ

## ( श्रीसद्‌गुरु साईमहाराज ललित-चरित्र )
## लेखांक १२

• र. श्री. पुजारी ( पुणे )

### २९. इतर कोणापेक्षा ज्याने झाड लावले त्याचे उपकार मोठे !

चैत्राचे कडक उन्ह. विहिरी खोल गेलेल्या. पाण्याविना माणसाचा आणि जनावरांना शोष पडलेला. तरीही शिरडीच्या दिशेने यात्रेकरूंची वाटचाल सुरू होती. मुंग्याप्रमाणे माणसे चोहोबाजूंनी येत होती.

कोणी घोड्यावरून, कोणी टांग्यातून. कोणी बैलगाडीतून, कोणी पायी. मिळेल त्या वाहनातून माणसे येत होती. तहान-भूक, उन्ह-वारा विसरून प्रवास करीत होती. शिरडी गावाच्या खुणा दुरून दिसू लागताच आनंदित होत होती. भावना उचंबळून येऊन एकमेकाना बोट करून दाखवीत होती. म्हणत होती, " ती पाहा ती मशिदीवरील निशाणे ! आता कशी स्पष्टपणे दिसू लागली ! शिरडी आता जवळ आली ! एका हाकेच्या अंतरावर राहिली ! "

ती दोन निशाणे दिसू लागताच यात्रेकरूंचे हात आपोआप जोडले जात होते. डोळे निवत होते. वाटचालीचा शीण ओसरत होता. जणू मशीदमाईच या निशाणांच्या रूपाने उभी होती. मान उंच करून कानशिलावर बोटे मोडून, वात्सल्याने भारावून म्हणत होती, " या रे या माझ्या चिमण्यापाखरांनो ! तान्हुल्या-सोनुल्यांनो ! केव्हाची मी तुमची वाट पहात आहे ? या, या असे पुढे ! मी तुमच्यावरून आधी भाकरतुकडा ओवाळून टाकते. मग तुम्ही आत या. "

खरोखरच ही मशीदमाई म्हणजे अनाथांची आई. तप्त जीवांची आमराई. तृषितांची पाणपोई.

दीन-अनाथ, पंगू-अपंग, थोटे लुळे, भुखे प्यासे — कोणीही येथे यावे. दोन घटका या माउलीजवळ बसावे. तिच्या अमृतदृष्टीत न्हावे. त्याला तेथे मज्जाव नाही. हिडीसफीडीस नाही. धिःकारणे नाही. जणू सर्व बाजूंनी येणाऱ्या गढूळ, ओंगळ, अशुद्ध गावओहळाना जवळ घेणारी ही पवित्र गंगा ! गंगामाई !

भाविकांचे मन भोळे. भावना नेहमी शुद्ध. अंतःकरण नेहमी पवित्र. निशाणांचे केवळ दूरचे दर्शनसुद्धा त्यांचे डोळे क्षणभर ओले करी. माथा नम्र करी. जणू जे घडले ते दर्शन पांडुरंगाच्या मंदिराच्या कळसाचे ! चिरवांछित दूरस्थ गंगेचे !

कोणाची पुण्याई कोणत्या रूपाने प्रकट होईल नेम नाही.

दामूशेट कासार नगरचे. नानासाहेब निमोणकर संगमनेरचे. दोघांचीही पूर्वजन्माची पुण्याई मोठी. त्याशिवाय बाबा त्यांना इतके जवळ करणार नाहीत. या निशाणांच्या रूपाने आपल्या व्दारी कायमचे स्थान देऊन त्यांना आपले जय--विजय करणार नाहीत.

पुत्रहीन दामूशेट, माधवरावांचे श्वशुर श्री गोविंदराव सापकर यांच्या सांगण्यावरून चारचौघांप्रमाणे शिरडीस येतात काय; मातीच्या त्या कोळंब्यातील चार आंबे बाबा त्यांना देतात काय; आणि हळूहळू बाबांच्या दाराचे द्वारपाल होतात काय—सगळेच अकल्पित.

तीच गोष्ट माधवरावांच्या या काकांची. आपल्या वृद्ध चुलत्यांना भेटण्यासाठी म्हणून ते शिरडीस आले. बाबांचे एकवार दर्शन घडले. आणि कायमचे शिरडीकर होऊन गेले !

दूरवरची ती निशाणे डोळ्यांना दिसताच यात्रेकरूंची थकलेली वाणी पल्लवित होई. पाहाता पाहाता तिला सुगंधी मोहर येई. मोठ्या रसाळपणे ती वाणी बाबांच्या लीला पुनःपुन्हा बोलू लागे. त्यात प्रथम गोष्ट निघे ती दामूशेट कासारांवरील कृपेची. फणसासारख्या असलेल्या बाबांच्या बोलण्याची.

मंडळी एकमेकाना ती हकिगत सांगत. म्हणत—

राळे मामलेदार नावाच्या कोणी भक्ताने बाबांना उत्तम आंब्यांचे एक पार्सल गोव्याहून पाठविले.

सही करून माधवरावांनी पार्सल सोडवून घेतले. फोडले. तर आत तीनशेवर उत्तम प्रतीचे सुंदर फळ निघाले.

त्या फळाला मशिदीची हवा लागली मात्र, नुसता घमघमाट सुटला. माधवराव त्यावेळी म्हणाले सुद्धा, "भक्तांचे भाग्य या फळांच्या रूपाने आज उदयास येणार. ते भाग्यवंत भक्त कोण आहेत ते एक बाबांनाच माहीत !"

अमृतासारखी ती फळे. बाबांची अमृतदृष्टी त्यांच्यावर विसावलेली. खरोखर हा योग अपूर्वच. माधवराव आनंदले तोच बाबा त्यांना म्हणाले, "शामा, ही फळे आता उचल घेऊन. जा घेऊन !"

माधवरावांनी ती फळे उचलली. त्यातील चार बाबांच्या कोळंब्यात टाकली. हे पाहून बाबा म्हणाले, "कोळंब्यात किती फळे टाकलीस ? चार टाकलीस ? बरे, बरे !' असू देत. आपल्या दामुअण्णाला होतील."

यावर तास दोन तास निघून गेले. गंध-फूल वगैरे घेऊन दामुशेट मशिदीच्या पायऱ्या चढू लागले. हे पाहून बाबा स्वतःशीच मोठमोठ्याने बोलू लागले, "काय म्हणावे लोकाना तरी ! आंबे कोणाचे, तर त्या दाम्याचे ! आणि हे उपटसुंभ टपले दुसऱ्यांचे आंबे खायला !"

थोडा वेळ बाबा स्तब्ध झाले. जणू कसला विचार ते करीत होते. तो करून होताच पुन्हा स्वतःशी म्हणू लागले, "दुसऱ्यांचे आंबे आपण का घ्यावे बरे ? ज्याचे त्यानेच ते खावे ! खावे आणि मरून जावे !"

बाबांच्या बोलण्यातील पहिली काही वाक्ये ऐकून दामुशेटना स्वर्ग केवळ दोन बोटे उरला. पण शेवटची ती दोन अभद्र वाक्ये ऐकून बाबा आपणास कायमचे पाताळात गाडत आहेत असे त्यांना वाटले.

एका निमिषात दामुशेटच्या अंगाला दरदरून घाम सुटला. घसा कोरडा पडला. पाय लटपटू लागले. मनाशी म्हणू लागले, "दैवात पुत्र नाही, म्हणून या मशीदमाईच्या आश्रयाला आलो. तर तीच अंगावर कोसळली ! वर देण्या-ऐवजी देहांताचे हे प्रायःश्चित तिने दिले ! आता कसचा माझ्या घरचा उंबरठा मी पहातो आणि कसचा त्या दोघींना — माझ्या धर्मस्त्रियांना पुन्हा भेटतो ! ते आंबे म्हणजे अमृत नव्हे. विषच. विष खाऊन जगात कोण जगला आहे !"

एक क्षणात दामुअण्णा मटकन खाली बसले.

दुसऱ्याच क्षणी म्हाळसापतींचे उद्गार त्यांना स्मरले.

म्हाळसापती त्यांना म्हणाले होते, "दामुअण्णा, वैद्याने दिलेले औषध क्षण-भर विषाप्रमाणे कडू जार वाटते, म्हणून आपण ते टाकतो काय ? ज्याचे अंतिम फळ गोड, ते सर्व गोडच. सद्गुरू तर मृत्युचाही पाश तोडणारे. भवभयाची मान मोडून अभय देणारे. त्यांच्या चरणी रुजू होताना मनास भय का वाटावे ? त्यांचा मार, शिव्या, क्रोध–सर्व काही वरवरचे. खोटे. लहान मुलाला खोटे खोटे दटावावे तसे ! घोंगडे पांघरून वडिलांनी घेतलेले ते बागुलबुवाचे सोंग !"

एका क्षणात दामुअण्णांच्या वृत्तीत पालट झाला.

मनोभावे बाबांच्या चरणांचे पूजन केले. चरणी मस्तक ठेवले. उठून, दोन्ही गुडघे टेकून, हात जोडून बाबांना मनात म्हणाले, "बाबा ! ज्या चरणांशी येताच विषाचे अमृत व्हावे, पापाचे पुण्य व्हावे, मृताला अमरतेची प्राप्ती व्हावी त्या चरणांच्या शीतलतेविषयी मी साशंक कशाकरिता व्हावे ? फूल गळते तेव्हाच फळाचा जन्म. पूर्व पाप आधी मरू दे मगच पुत्राचा जन्म, असा तर तुमच्या बोलण्याचा अर्थ नव्हे ! शापाप्रमाणे दाहक दिसणारा परंतु अंतर्यामी अमृताप्रमाणे गोड असणारा हा वर तर नव्हे !"

दामुअण्णांनी जोडलेल्या हातांची न कळतच ओंजळ झाली.

डोळे उघडून पाहिले जर बाबांनी ती चार फळे त्यांच्या ओंजळीत घातली होती.

त्या फळांच्या सुगंधाने दामुअण्णांचे भाविक मन प्रसन्न झाले. मनाशी ते म्हणाले, "वाडवडिलांवर जी संतकृपा झाली ती या फळांच्या रूपाने आज हाती

आली. आता ज्या ऐहिकासाठी मी येथे आलो ते ऐहिक मला लाभो किंवा न लाभो. मला त्याची भीती नाही. सद्‌गुरूंच्या इच्छेविना कोणतेही कार्य घडत नाही. ''

सद्‌गुरूंचा प्रसाद म्हणून ती चार फळे दामुअण्णांनी मोठ्या आनंदाने बिऱ्हाडी आणली. हृदयाशी घट्ट घट्ट कवटाळली. मस्तकाशी पुनःपुन्हा धरली.

नंतर परत जाऊन बाबांना विचारले तेव्हा बाबा म्हणाले, "ही फळे धाकलीलाच दे. तिला चार पोरगे आणि चार पोरी होतील. ''

बाबांचा तो शब्द! तो शब्द खोटा कसा होणार? तो खरा झाला. दामुअण्णाना पुत्र झाला.

दामुशेटच्या घरावर कुलदीपांकित गुढी बाबांनी उभी केली. मग दामुशेट बाबांचे द्वारपाल का होणार नाहीत? बाबांच्या मशिदीचे द्वार धरून वंशावंशी निशाणांच्या रूपाने का राहाणार नाहीत? इतर कोणापेक्षा ज्याने झाड लावले त्याचे उपकार मोठे. कधीही न विसरता येण्यासारखेच ते उपकार.

**३०. परमार्थातील शाश्वतचा प्रपंच खरोखर या एका राधाकृष्णामाईने केला.**

पहाटेचे चारसुद्धा वाजले नसतील. कोणी एक व्यक्ती एका घरातून बाहेर पडली. झपाझप पावले टाकीत रस्त्यावर आली. अंगावरील वस्त्राचा पदर कमरेला घट्ट खोचून हातातील केरसुणीने रस्ता झाडू लागली.

बाबांच्या येण्याजाण्याचा हा मार्ग. लेंडीवर जाण्याची ही वाट. ती वाट स्वच्छ ठेवली पाहिजे. तिच्यावर यत्किंचितही घाण असता कामा नये.

जे व्रत बाळाजी पाटील नेवासकर यांनी अनेक वर्षे चालविले, ते व्रत आता ही व्यक्ती चालवीत आहे. वाटेवरील घाण हाताने निपटत आहे. गोमयाचा सडा वर शिंपत आहे. तो शिंपताना किंवा रांगोळी घालताना मुखाने कसलेसे गीत गुणगुणत आहे. त्या गीतात रंगून जात आहे.

बाबांखेरीज ते गीत दुसऱ्या कोणत्या देवाचे असणार?

गौरीहर पुजून जो देव मानला तो काळाने पाश टाकून ओढून नेला. त्याची सेवा हातून घडली नाही. पूजा होण्याआधीच ती मूर्ती भंगली. शोक आवरून, डोळे पुसून वडीलधाऱ्याना पुढील मार्ग विचारला तेव्हा त्यांनी एकमुखाने सांगितले, "या पुढे तुझे दैवत भगवान श्रीविष्णू. त्यांची सेवा करून, विधवाधर्म पाळून पूर्ण वैराग्याने उरलेले आयुष्य कंठावे. देहाचे सार्थक त्यात आहे. ''

जिचा सासरचा आधार तुटला तिला माहेरी तरी आधार कोठला? तिला सर्वत्र वणवाच. त्या वणव्यातून ती बाहेर कशी पडणार? बाहेर पडण्याचा मार्ग एकच--तो म्हणजे भरलेली विहीर किंवा नदी!

बाबांच्या येण्याजाण्याचे रस्ते निर्मळ ठेवणारी ही निपुत्रिक, गतधवा स्त्री त्या मार्गाला किती वेळा गेली असेल !

परंतु प्रत्येक वेळी तिची पाउले कोणी तरी मागे वळविली. त्या दुबळ्या क्षणी तिचे रक्षण केले. तिला परत घराकडे आणले.

तिला परत घराकडे आणले ते या मार्गाचे प्रस्थान ठेवण्यासाठी. उरलेले आयुष्य श्रीविष्णूचरणी समर्पित करण्यासाठी.

तो मानवरूप श्रीविष्णू सद्‌गुरुरूपाने तिला या गावी भेटला.

त्या क्षणापासून देहधारणेपुरते अन्न, देहरक्षणापुरते वस्त्र, अत्यल्प निद्रा यांचे सेवन करून अष्टौप्रहर ही स्त्री गुरुसेवाकारणी चंदनाप्रमाणे झिजत आहे. आपल्या सेवेच्या सुगंधाने सर्वांचा प्रेमादर संपादन करीत आहे,

या स्त्रीचे आडनाव आता मागे पडले. नावही हळूहळू पुसट होत चालले. जणू त्या नावाचा आणि आडनावाचा येथे आल्यानंतर मृत्यु घडला. ते जुने बंध, पाश येथे निखळून पडले. जे नवे नाव येथे लाभले त्याचे नामकरण स्वतः बाबांनी केले. या स्त्रीला ते ' राधाकृष्णी ' म्हणाले. तेच नाव या तिच्या पितृगृही आता रूढ झाले.

राधाकृष्णाची मूर्ती नित्य जवळ बाळगणारी, त्या मूर्तीवर जीव की प्राण असे प्रेम करणारी म्हणून राधाकृष्णा. तिचे आदरार्थी रूप राधाकृष्णाबाई. परंतु एवढा आदरही कमी वाटला म्हणून की काय ही स्त्री राधाकृष्णाआई झाली. समर्थशिष्या आक्काबाई आणि वेणूबाई यांच्या प्रमाणेच बाबांच्या अनेक भक्तांची ही आई झाली.

अबोल स्वभाव, पायाच्या अंगठ्याशी स्थिर असलेली दृष्टी. सौम्य, प्रेमळ वाणी. प्रभु चिंतनात लीन असलेले मन. प्रभुचरणी नित्य द्रवलेले चित्त. जणू ही तरुण स्त्री नित्य मनाच्या एकांतात आहे. जे बोलत आहे. सांगत आहे, विनवीत आहे ते एकांतीच्या त्या एका प्रभूला !

तरी पण या आईचा शब्द एखाद्या सुगंधी फुलाप्रमाणे झेलला जात आहे. तिच्या मनातील योजनाना हां हां म्हणता रंग-रूप-आकार येत आहे. माणसाला माणूस वाहून अनेक सुंदर स्वप्ने साकार होत आहेत. मशीद, सभामंडप, चावडी, वाडा यांचे मूळ रूप सहस्र हातांनी बोलता बोलता पालटत आहे.

चावडीत रात्रीच्या वेळी बाबांची शेजारती करावी ही कल्पना राधाकृष्णा-आईची. आरतीच्या वेळी बाबांवर ढाळण्यासाठी चवऱ्या, छत्रचामरे, मोर्चेल आणविले ते यांनीच. बाबांचा घोडा, पालखी, चोपदार, टके-पताका, भजनकरी मंडळी हा सर्व सरंजाम निर्माण केला तो यांच्या कुशाग्र, रसिक, भाविक बुध्दीने.

मशिदीला फरशी नव्हती. चावडीतही गुडघा गुडघा खड्डे होते. ते बुजवून

दोन्ही ठिकाणी फरशा करवून, त्यावर बाबांसाठी सुंदर गादीतक्क्या करवून बाबांची बैठक सुशोभित व सुखद करणारी पहिली व्यक्ती ही स्त्री! आरसे हंड्या, झुंबरे, तसबिरी निरनिराळया भक्तांकडून निरनिराळ्या प्रसंगी, निरनिराळया निमित्ताने आणवून ओंगळ दिसणारी चावडी सजवून तिला एखाद्या राजमहालाचे वैभव आणणारी हौशी, कलादृष्टीची पहिली भक्त स्त्री ही! चावडीस पहाटे बाबांची काकडआरती करण्याची प्रथा पाडून रामप्रहरी बाबांचे दर्शन, सेवा घडविणारी पहिली स्त्री ही!

राधाकृष्णाआईच्या कल्पकतेच्या, हुषारीच्या, धोरणीपणाच्या किती गोष्टी सांगाव्या? खरोखर संस्थानाचे स्वरूप शिरडीस त्यांनी आणले. अहोरात्र उद्योग करून अवघ्या काही वर्षांत शिरडीचे रूप त्यांनी पार पालटून टाकले.

माणसे चातुर्याने कशी वळवावीत, त्याना कामास कसे लावावे, बुजऱ्या माणसाना आपल्या गोड वाणीने कसे सामावून घ्यावे हे सर्व शिकावे तर एकट्या राधाकृष्णाआईकडून. नाना धर्मांची, नाना वृत्तींची, लहरी, चंचल, आळशी — सर्व माणसे फुलांप्रमाणे त्यांनी एका माळेत ओवली. त्या सर्वांची मने सेवाकार्यावर एकाग्र केली. ज्या ज्या प्रकारे बाबांची सेवा करता येईल ते ते मार्ग स्वतःच्या उदाहरणाने दाखवून दिले.

स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत, विद्वान-अविद्वान हे भेद राधाकृष्णाआईनी येथे नष्ट केले. रस्ते झाडणे असो; चिखल करणे किंवा वाहाणे असो; खड्डे खोदणे किंवा भरणे असो. दगड--माती वाहाणे, लाकडे फोडणे किंवा झाडे लावणे असो— राधाकृष्णाआईनी माणसामाणसात भेद केला नाही. मशीद धुणे, पुसणे, रंगविणे, हंड्या--झुंबरे स्वच्छ करणे, कागदाची फुले कातरणे; चवरी-मोर्चेल-अबदागिरी-निशाणे धरणे किंवा निशाणे शिवणे--ही कामे त्यानी मोठ्या घराण्यातील कुलस्त्रिया-कडूनही मोठ्या गोडीने करवून घेतली. ती करीत असताना सेवेची संधी आपणास केवळ दैवयोगे मिळाली ही आनंदाची आणि कृतार्थतेची भावना त्यांच्या मनात निर्माण केली.

पूर्वायुष्यातील या सुंदराबाई क्षीरसागर. त्यांचा प्रपंच दुर्दैवाच्या झंझावाताने मोडला. पण समर्थशिष्या आक्काबाईप्रमाणे श्रीसमर्थ बाबांच्या वैराग्यपूर्ण प्रपंचाची शोभिवंत मांडणी यानी केली. परमार्थातील शाश्वतचा प्रपंच खरोखर या एका राधाकृष्णाआईने येथे केला.

आज रामनवमी. मशिदीत आज रामजन्मोत्सव साजरा होणार.

या मंगल प्रसंगाच्या निमित्ताने अमाप यात्रा येथे आली आहे. ती अद्याप साठे आणि दीक्षित यांच्या वाड्यात निद्रित आहे. तिला हळूहळू जाग येईल आणि माणसांची गजबज वाढू लागेल. वर्दळ सुरू होईल. त्या आधीच आपला नित्याचा

कार्यक्रम उरकलेला बरा, असे कदाचित राधाकृष्णाआईना वाटले असावे. म्हणूनच नित्यापेक्षा आज लवकर उठून सेवेची सुरुवात त्यानी थोडी आधीच केली असावी.

पडद्याआड राहून सूत्रे हलवावी हा राधाकृष्णाआईचा स्वभाव. तो आज या भल्या पहाटेही प्रकट होत आहे.

पांढऱ्या रंगाचे पातळ. दोन्ही हातात आणि गळयात तुळशीच्या बारीक मण्यांच्या माळा. पांढऱ्या फटफटीत कपाळावर मध्वसांप्रदायिकाप्रमाणे असलेली उभी काळी रेघ, नाके-डोळी-नीटस, बांधेसूद.

ऐन पंचविशीतील वैराग्याची ही मूर्ती पाहून कोणाच्याही मनात आदरच निर्माण व्हावा.

चरणांचे दर्शन भक्तिभावाने घेण्याची प्रेरणा व्हावी.

तो संपर्क टळावा, देवापेक्षा भक्तांचेच देव्हारे माजू नयेत म्हणूनच की काय ही स्त्री नित्य एकांतात राहात आहे. इतर सर्व जागा सोडून पूर्वी जेथे मुलींची शाळा भरत असे ते एकटे, एकाकी घर तिने स्वतःस राहाण्यासाठी पसंत केले आहे.

घराच्या आतील भागातील एका कोपऱ्यात बैठकीची एक स्वच्छ, सुंदर गादी. तिच्यामागे एक उत्तम प्रतीचा लोड. गादी आणि लोड या दोहोनाही पांढरे शुभ्र अभ्रे घातलेले. लोडाशी श्रीबाबांचे दोन सुंदर फोटो टेकवून ठेवलेले. त्यातील एका फोटोला फुलांचा सुंदर हार घातलेला. सुवासिक उदबत्त्या त्या फोटोसमोर दरवळत असलेल्या.

विशेष परिचयातील कोणी वडिलधारी व्यक्ती तेथे चुकून कधी गेलीच तर तिच्या दृष्टीस जे दृश्य पडे ते पाहून ती व्यक्ती जागीच खिळून राहावी! एका क्षणात तिला भावसमाधी लागावी!

बाबांच्या फोटोसमोर मांडी घालून, तंबोऱ्यावरून संथपणे आपली निमुळती बोटे फिरवीत राधाकृष्णाआई तन्मयतेने गात गात आहेत. गीतगोविंद या नादमधुर संस्कृत काव्यातील भक्तिरसपूर्ण पदे विविध रागरागिणीत गाऊन आळवीत आहेत. जणू कृष्णभक्तीने वेडी झालेली मीरा सदेह होऊन आज या शिरडीत पुन्हा अवतरली आहे.

मीरेने आपले सर्व आयुष्य श्रीकृष्णचरणी अर्पण केले.

राधाकृष्णाआई त्याच एका वेडाने, ध्यासाने, कोणत्याही विषाचा प्याला ओठाशी लावण्यास आता सिद्ध आहेत.

## ३१. नामदेवासारखी ज्याची भक्ती भोळी, त्याला काय मी मारू?

काशिक्षेत्री गंगेच्या पश्चिम किनाऱ्यावर एका ओळीने बांधलेले किती घाट! त्या प्रत्येक घाटावर किती शिवलिंगे! किती गणेशमूर्ती! श्री काशिविश्वे-

श्वराने जमविलेला हा गोतावळा पाहून एकनाथ नास्तिकाने म्हणावे, "देवादिकांना आपण निःसंग मानतो. पण त्यांच्यामागेसुद्धा केवढा मोठा गोतावळा असतो! गोतावळ्याविना देवादिकांनासुद्धा चैन पडत नाही की काय!"

शिरडीस बाबांनी जमविलेला भक्तांचा गोतावळा पाहून पुण्यामुंबईची मंडळी म्हणत "मोठमोठ्या मामलेदार-मुन्सफानी पेन्शन झाल्यानंतर शहरातील आपल्या मुलानातवंडात बसून शांतपणे आयुष्य घालविण्याचे सोडून कसल्याही सुखसोयी नसलेल्या त्या खेडेगावात जाऊन पडावे हा काय शहाणपणा म्हणावा!

बघावे तिकडे उकिरडे. जनावरांची विष्टा-मूत्र. दुर्गंधीने भरलेले गल्लीबोळ. मोकाटपणे सर्वत्र संचार असलेली कुत्री, डुकरे...त्या खेडेगावी प्यायला धड पाणी नाही. काही साथ आली, माणसे रोगामुळे पटापट मरू लागली तर औषध द्यायला डॉक्टर नाही. सर्वांचा सर्व भार एक काय तो बाबांवर! पण बाबा तरी किती गोष्टी जातीने पाहाणार! किती गोष्टींना पूरे पडणार! शेवटी व्यवहार तो व्यवहार आणि देवधर्म तो देवधर्म!"

शहरातील नातेवाइकांची ही दूषणे सोसूनसुद्धा अनेक वृद्धानी शिरडीचा रस्ता धरला. भाड्याने जागा घेतल्या. गरजेपुरती भांडी, गरजेपुरते अन्न-वस्त्र. जणू या वानप्रस्थाश्रमात पसारा वाढवायचा नाही. कोर्टकचेऱ्या, देणीघेणी, मान-प्रतिष्ठा अशा चिंध्या येथे फाडायच्या नाहीत. तो विषयच येथे काढायचा नाही. आता विषय एकच, विचार एकच : कोणत्याही क्षणी कोसळून सडू लागणारा मर्त्य देह व्याधींच्या स्वाधीन होण्यापूर्वीच बाबांच्या चरणी पडावा. बाबांच्या चरणांचा दिव्य स्पर्श त्याला घडावा.

बापूसाहेब जोग इंजिनिअरिंग खात्यातील मोठे अधिकारी. हाताखाली नोकरमाणसे. हुकूम करण्याची मनास सवय. उत्तम राहाणीने राहाण्याची देहास आणि मनास चटक. ते बापूसाहेब येथील सर्व गैरसोयी आनंदाने सोसून बाबांच्या चरणी विसावले आहेत. बाबांची नित्य पूजा, आरती, सहवास, चिंतन या कामी उरलेल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण वेचत आहेत..

आज पहाटेही बापूसाहेब नेहमीप्रमाणे ब्राह्ममुहूर्तीं उठले आहेत. बाबांच्या फोटोसमोर उदबत्ती लावून आपल्या बिन्हाडी बाबांची काकडआरती करीत आहेत. श्रीदत्तात्रयाना गायनभक्ती प्रिय, म्हणून बाबांच्या फोटोसमोर बसून स्वरचित पद म्हणत आहेत. ते म्हणतात त्याच्या डोळ्यांच्या बाहेरील कडांमधून भक्तीप्रेमाचे अश्रू न कळत ओघळत आहेत.

सबंध शिरडी गावात बाबांच्या भक्तांच्या बिन्हाडी थोड्याफार फरकाने हेच दृश्य या वेळी दिसत आहे.

काकासाहेब दीक्षित, नानासाहेब चांदोरकर, तात्यासाहेब नूलकर, अण्णासाहेब चिंचणकर, काकासाहेब महाजनी, काकासाहेब निमोणकर, बाळकृष्ण

विश्वनाथ देव, राधाकृष्णाआई--अशी किती नावे सांगावी! भक्तांच्या मनोमन भक्तीचे किती वर्णन करावे!

समई तेववून तिच्या मंद प्रकाशात कोणी ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, रामायण, गीता यापैकी एखाद्या धर्मग्रंथाचे वाचन बाबांच्या आज्ञेवरून करीत आहे. कोणी देवापुढे बसून, डोळे मिटून नामस्मरण करीत आहे. कोणी बाबांची मानसपूजा करीत आहे. कोणी एखादे पद भक्तीभावाने घोळून घोळून हलक्या आवाजात स्वतःशीच म्हणत आहे.

मंदिररूप बनलेल्या भक्तांच्या घराघरातून सुगंधाप्रमाणे भक्ती दरवळत आहे. घराबाहेर पडून या थंडशा प्रातःकाळी अरुणोदयी गावातून फेरफटका करावा तर तीच भक्ती दारोदारी, गल्लोगल्ली वेगवेगळ्या रूपाने पुन्हा भेटत आहे.

कोणी अंगण झाडत आहेत. कोणी शेणगोटा करीत आहेत. कोणी धारा काढीत आहेत. कोणी ताक घुसळत आहेत. कोणी पाणी आणीत आहेत. कोणी अजुनही पहाटेचे दळण दळत आहेत.

अंगण झाडताना, शेणगोटा करताना; धारा काढताना, ताक घुसळताना; पाणी आणताना, दळण दळताना स्त्रियांच्या तोंडी बाबांवरून केलेल्या ओव्या आहेत. त्या ओव्या त्यानीच वेळोवेळी सहज बोलता बोलता रचल्या आहेत. पाहाता पाहाता आता त्या ओव्या चलणी नाण्याप्रमाणे घरोघरी पोचल्या आहेत. लेकी-सुना, पै पाहुणे, आले-गेले सर्वांच्या मुखी खडीसाखरेप्रमाणे त्या विरघळत आहेत.

माणूस खळ्यात असो किंवा मळ्यात असो; विहिरीवर असो किंवा ओढ्यावर असो; चुलीपुढे असो किंवा शिवण–टिपण करीत दाराशी उजेडाला असो–बाबांच्या ओवीरूप लीला माणसाच्या मनात भक्तीच्या सात्त्विक आनंदलहरी निर्माण करीत आहेत. जणू सबंध शिरडी गावच एका सात्त्विक आनंदाने भारले आहे. प्रपंचातील दुःखे, कष्ट, क्लेश विसरून बाबांच्या प्रेमतरंगावर मौजेने तरंगत आहे.

या पहाटेच्या सुमारास बाबांच्या फोटोसमोर बसल्या बसल्या बापूसाहेब जोग गावातील या भक्तीचा आस्वाद घेत आहेत. म्हणत आहेत "बाबा, शहरातील लोक आम्हास नावे ठेवतात. या शिरडीस कुग्राम म्हणतात. पण स्वर्ग म्हणतात तो या तुमच्या प्रिय गावाहून काय निराळा आहे! माहेर लौकिकदृष्टया कितीही दरिद्री असले म्हणून माहेरवाशिणीस ते कधी हीन झाले आहे?"

माहेरच्या कष्टातही प्रेम ओथंबून उरते. मीठभाकरीतही अमृत निर्माण होते. चंद्रमौळी घराची छायाही कल्पवृक्षाप्रमाणे शीतल वाटते.

श्रीरामांच्या वनवासातील वास्तव्यामुळे दंडकारण्य रामरूप झाले. तेथील वृक्षावृक्षावर पाषाणापाषाणावर कणाकणांवर श्रीरामाचे नाम कोरले गेले. आम्ही तर मन, भावना, संवेदना असलेले मानव. आत्मोध्दारासाठी तळमळत असलेले

प्रापंचिक जीव. वानरांचा उध्दार जर केवळ एका नामामुळे झाला, तर आम्हा नरांचा उद्धार होऊन आम्ही नारायण का होऊ नये ?

बापूसाहेब जोगाना या क्षणी महाव्याधी झालेल्या भागोजी शिंदे यांची आठवण झाली. मशिदीतील या क्षणीचे दृश्य डोळ्यासमोर दिसू लागलं.

भागोजी बाबांच्या उजव्या हाताचे पट्टे सोडत आहे. हात चोळत आहे. अंग दाबीत आहे. चिलीम भरून. आपण आधी झुरका मारून ती पेटवून बाबांच्या हाती देत आहे. अशी देवघेव पाच सहा वेळ चालली आहे. सबंध मशीद चिलमीच्या धुराने भरली आहे.

बापूसाहेबांच्या मनात विचार येत आहे. स्वतःशी म्हणत आहेत : ही देवघेव म्हणजे भागोजीच्या सूक्ष्म देहाचे स्नान तर नव्हे. भागोजीचा मलीन लिंगदेह स्वच्छ करण्याची नित्याची क्रिया तर नव्हे ? खरोखर हा भागोजी पूर्वजन्मीचा कोणी शापभ्रष्ट जीवात्मा असला पाहिजे. त्याविना ही संधी त्याला मिळणार नाही.

ज्यानी आपली पूजा मोठमोठ्या भक्ताला करू दिली नाही ते बाबा काही विशेष कारण असल्याविना भागोजीला इतका जवळचा मानणार नाहीत. पूजेपेक्षाही श्रेष्ठ अशी ही सेवा त्याच्याकडून घेणार नाहीत.

बाबांच्या पूजेचा सर्व इतिहास बापूसाहेबांच्या डोळयासमोर एका क्षणात उभा राहिला.

बाबांची पहिली पूजा करण्याचा मान मिळाला तो म्हाळसापतीना. पण भीतभीतच हा मान त्यांनी पटकावला. जेमतेम बाबांच्या गळयास गंध लावून चरणावर फुले ठेवून घामाघूम होऊन ते खाली बसले.

परंतु खऱ्या भोळया भावाला भीती कसली ? नानासाहेब चांदोरकरांचा चार वर्षे वयाचा धाकटा मुलगा बापू गंध-फूल घेऊन सरळ मशिदीत गेला. बाबांसमोर जाऊन उभा राहिला. म्हणाला, " बाबा, थांबा. हलू नका. मी तुमची पूजा करणार आहे. "

एखाद्या संगमरवरी पुतळयाने करून घ्यावी तशी पूजा बाबांनी त्याच्याकडून सस्मित चेहऱ्याने करून घेतली. म्हणाले, " माझी पूजा करतोस ? कर बाबा. हा बघ मी देवासारखा नीट बसलो. "

जी गोष्ट बापूची, तीच गोष्ट डॉ. पंडित यांची.

सद्गुरूंच्याठायी बालभाव असलेले डॉ. पंडित बाबांना लोक मुसलमान समजतात, मुसलमानाच्या कपाळी गंध लावायचे नसते हेही विसरले. दादा केळकरांच्या घरून स्नान करून मशिदीत आले. स्नेही तात्यासाहेब नूलकर यांनी बाबांच्या पूजेच्या मर्यादा सांगण्यापूर्वीच दादांच्या हातातील पूजेचे तबक हस्तगत

केले. बाबांचे कपाळ एका हाताने घट्ट धरले. दुसऱ्या क्षणी भयभीत झालेले तात्यासाहेब डोळे उघडून पाहातात, तो डॉ. पंडित यांनी बाबांच्या कपाळी केशरी गंधाचे छानसे त्रिपुंड्र रेखलेले !

संध्याकाळी बाबांची मनोवृत्ती प्रसन्न आहे असे पाहून दुजाभावाचा हा प्रेमळ प्रश्न दादा केळकरांनी काढला तेव्हा बाबा हसत हसत एवढेच म्हणाले, "दादा, अरे त्याचा गुरु बामण. गंध लावणारा. मी मुसलमान हे तो खुळा विसरलाच ! आता तूच सांग, नामदेवासारखी ज्याची भक्ती भोळी, त्याला मी काय मारू ? दादा, तुला खरे ते सांगतो : भक्त असावा तर असा भोळा. भक्ती असावी अशी निर्मळ. खरी गुरुभक्ती हीच."

बापूसाहेब जोगांच्या डोळ्यासमोर मेघा या गुजराती तरुणाची निष्पाप, भोळी मूर्ती उभी राहिली. साठेसाहेबांचा हा गुजराथी नोकर.

नोकरीत असताना विशेषतः फिरतीवर असताना अनेक प्रकारची माणसे भेटतात. अट्टल गुंड, पक्की डाकू, लबाड, मतलबी, चारित्र्यशून्य, लाचार... पण सर्वच माणसे काही वाईट नसतात. त्यांच्यात एखादा भोळा, सरळ मनाचा, श्रावार्थी मनुष्यही भेटतो. त्याचे-आपले ऋणानुबंधही निर्माण होतात. त्या व्यक्तीची ताटातूट होताना मन थोडेफार कासावीसही होते.

गुजराथेतील खेडा जिल्ह्यात प्रांत ऑफिसर असताना साठेसाहेबांना हा मुलगेला तरुण भेटला. त्याचा भाविक, भोळा स्वभाव पाहून साठ्यांनी मनाशी विचार केला : भोळा चक्रवर्ती जो सांब, त्याची पूजा करण्यास हा ब्राह्मण मुलगा चांगला आहे.

पुढे साठेसाहेब शिरडीस आले. श्री बाबांच्या चरणी श्रद्धा जडली. ती दृढ झाली. पुढे स्थानिक पुढाऱ्यांच्या सहकार्याने उखरीची जागा मिळवून तिच्यावर वाडा बांधला. असे महान भक्त साठेसाहेब धनी म्हणून त्या गरीब मेघाला लाभले हे त्याचे केवढे भाग्य !

एक दिवस साठेसाहेब मेघाला म्हणाले, "अरे मेघा, तुला एक चांगले काम सांगतो. करशील ?"

स्वामिनिष्ठ मेघा एका पायावर तयार झाला. त्याचे निष्पाप डोळे आनंदाने लकाकले. 'जी धनी' या शब्दांबरोबर दोन्ही हात जोडले गेले. माथा नम्र झाला. आज्ञेची वाट पाहू लागला.

साठेसाहेब म्हणाले, "मेघा, तुला शिवाची पूजा आवडते. तू शिवभक्त आहेस. तर असे कर : कावडीने गंगेचे पाणी आण आणि ते शिवावर घाल. शिरडीतील शिवावर !"

काशीस यात्रेकरू भक्त गंगेवर स्नान करतात. कावड आणून त्या पाण्याने शिवावर अभिषेक करतात. त्यामुळे त्याना मोठे पुण्य लागते. अंती ते शिवलोकी

जातात. हे सर्व मेघाला माहीत. त्यामुळे तो अधिकच खूष झाला. म्हणाला, " केव्हा जाऊ मी शिरडीस ? शिरडीस कोठेसे आहे ते शिवालय ? "

साठेसाहेब हसू लागले.

एखाद्या रानपाखराप्रमाणे साधे, सरळ जीवन जगणाऱ्या त्या पोराला म्हणाले, " शिरडीस कोणालाही विचार. म्हणावे, मशीद कोठे आहे ? गंगेची ही कावड मी कोपरगावाहून आणली आहे. तिने मला बाबांना स्नान घालायचे आहे. "

साठेसाहेबांच्या या शब्दांनी मेघाचा चेहरा एकदम उतरला. एखादा साप अंगावर यावा त्याप्रमाणे तो दोन हात मागे सरला. मग साहेबांना त्याने बाबांची जात विचारली. बाबा मुसलमान आहेत हे स्पष्ट होताच मनाशी तो म्हणाला : मुसलमानाची जात म्हणजे नीच, क्रूर. त्या मुसंड्याला काय मी देव मानू ? शिव समजून काय त्याची पूजा करू ? साफ करणार नाही.

पण मेघा पडला चाकर. घातल्या अन्नाचा, दिल्या वस्त्राचा नोकर. तो काय बोलणार ? धन्यांची आज्ञा म्हणून तसाच शिरडीस आला. मशिदीच्या अंगणात येऊन उभा राहिला. आता पायरी चढणार तोच बाबा दगड घेऊन, रुद्रावतार धारण करून त्याला म्हणाले, " खबरदार माझ्या पायरीवर पाऊल ठेवशील तर ! तू बामण, जन्माने श्रेष्ठ. माझ्यासारख्या नीच, क्रूर मुसंड्याच्या मशिदीत पाऊल ठेवतोस ! उतर आधी खाली ! तुला बामणाला आमचा इंटाळ होईल. बाटशील तू ! "

बाबांच्या एवढ्या शब्दानी मेघाच्या वृत्तीत जो पालट घडला तो मेघा बाबाना पुढे पुढे साक्षात शिवशंकरच मानू लागला. ' साईशंकर ' ' साईशंकर ' या नामाचा त्याने धोशा लावला. कोस दीड कोसावरून रोज बाबांसाठी बेल आणू लागला. आणि एका मकरसंक्रांतीस तर आपल्या इच्छेने कोपरगावास जाऊन, आठ-नऊ मैलावरून खांद्यावरून कावड आणून ' हर गंगे ' म्हणून ती त्याने बाबांच्या मस्तकावर ओतली !

श्रीशंकर भोळा चक्रवर्ती. आपले रौद्र रूप दाखवून त्याने भक्तांना क्षणभर भिवविले तरी ते खरे नव्हे. तो केव्हा विरघळेल याचा नेम नाही.

जे निंबगावच्या सीतारामजी डेंगळ्यांसारख्या भल्या भल्या भक्तांना जमले नाही; बाबांच्या छातीवर हात ठेवून रात्रभर त्यांना चिकटून बसणाऱ्या म्हाळसापतींसारख्या जुन्या, एकनिष्ठ भक्ताना जमले नाही ते चांदोरकरांच्या बापूसारख्या एका पोराने केवळ भोळ्या भावाने चुटकीसरशी करून दाखविले. परम गुरूभक्त डॉ. पंडित आणि समर्थांच्या भोळ्या रामाप्रमाणे असलेल्या मेघाने करून दाखविले. बाराही महिने हिमाच्छादित असलेले ते कैलास शिखर

केवळ प्रेमाच्या आचेने सर केले. आता सर्वांनाच तेथे जाण्यास पायवाट झाली. माझ्यासारखे सामान्य भक्तही वरपर्यंत जाऊन मोठ्या समाधानाने त्या कैलास-नाथाची पूजा करू लागले.

## ३२. पोथीचे अंतरंग खोलून दाखविण्याची गुरूकिल्ली एका सद्गुरूच्या हाती

बापूसाहेब जोग आपल्या बिन्हाडी बाबांच्या चिंतनात असे निमग्न आहेत. तर तिकडे दीक्षितांच्या वाड्यात पोथीवाचनाचा कार्यक्रम सुरू आहे.

सुंदर मृगाजिन, चौरंग. दोन उंचशा समया. त्या प्रकाशात बाळकृष्ण विश्वनाथ देव मामलेदार पोथी वाचीत आहेत. अत्यंत तन्मयतेने पोथीतील प्रत्येक शब्द उच्चारीत आहेत. जणू हे वाचन नव्हे, पोथीशी चाललेले जिव्हाळ्याचे संभाषणच!

या संभाषणाच्या वेळी देव मामलेदार किती वेळा थांबत आहेत! गहिवर येऊन किती वेळा मूक होत आहेत! किती वेळा डोळे आणि चष्म्याची अभ्राच्छादित भिंगे पुसत आहेत! जणू पोथीतील त्या दिव्य जगात ते मनात वावरत आहेत! साक्षात भगवंताचे ते शब्द अर्जुनाप्रमाणे शरणागत होऊन हृदयाच्या संपुष्टात साठवीत आहेत!

काकासाहेब दीक्षित, अण्णासाहेब दाभोळकर, बाबासाहेब तर्खड, श्रीमंत बापुसाहेब बुटी अशी मोठी माणसे श्रवणास बसली आहेत. आपली विद्वता आणि श्रीमंती विसरून पोथी ऐकत आहेत! भोळ्या भाविकांप्रमाणे हर्ष, खेद, भक्ती या भावनांनी अंकित होऊन समरसतेचे सहजोद्गार काढीत आहेत. जणू देव मामलेदारांप्रमाणेच तेही या क्षणी पोथीतील जीवन अनुभवीत आहेत. कल्पनेच्या साहाय्याने ते जीवन जगत आहेत.

एक क्षणभर दीक्षितांचे मन पोथीवरून उडत आहे. भूतकाळात वावरत आहे. मनाशी ते म्हणत आहेत: ज्ञानेश्वरीवरीत लक्षच लागत नाही असे म्हणणारे ते देव; आणि समोरील ज्ञानेश्वरीच्या गंगौघात खडीसाखरेप्रमाणे विरघळून गेलेले हे देव — या दोन व्यक्ती एकच का? खरोखरच सद्गुरूंच्या कृपेमुळे चित्तवृत्तीत केवढा बदल घडून येतो?

देवाना व्यसन एकच: अध्यात्मग्रंथ वाचण्याचे!

या व्यसनापायी अक्षरशः शेकडो ग्रंथांचा त्यानी फडशा पाडला. शेकडो अवतरणे, मतमतांतरे, सूक्ष्म पाठभेद, निरनिराळ्या संहितांतील दुर्लक्षित संशोधन स्थाने — देवांचा व्यासंग केवढा!

पण एक ग्रंथ मात्र काही केल्या त्याना दाद देईना! आपले हृद्गत सांगेना. आपले वाचन अखंडपणे काही करू देईना! तो ग्रंथ म्हणजे ज्ञानेश्वरी!

भगवद्‌गीतेच्या एका अध्यायाबरोबर नित्य नेमाने ज्ञानेश्वरीचाही एक अध्याय वाचावा ही देवांची इच्छा. पण ती काही पुरी होईना. पाच ओव्यासुद्धा काही रोज वाचून होईनात. पोथी उघडून ज्ञानेश्वरीतील ओवी वाचण्यास सुरुवात केली की डोळे झोपेने भरले! नाना शंकाकुशंकानी मस्तक फिरले! जणू त्या जगन्मान्य ग्रंथाचे आणि देवांचे कोणत्या जन्मीचे वैर!

अखेर तीन महिन्यांची रजा काढून देव येथे शिरडीस आले. येथून पौंडास आपल्या मूळ गावी गेले. तेथेही इतर नित्यनैमित्तिक पोथी वाचन छान झाले. पण ज्ञानेश्वरी उघडली की हरिदासाची कथा मूळ पदावर!

शेवटी कंटाळून ज्ञानेश्वरीची ती सुंदर प्रत एका बासनात बांधून ठेवून दिली. उद्विग्नपणे म्हणाले, "आता प्रत्यक्ष बाबाच जेव्हा मला "ज्ञानेश्वरी वाच" म्हणून आज्ञा करतील तेव्हाच मी ती उघडेन. तोपर्यंत ती आहे तशीच बासनात असू दे."

पुढे अशाच एका प्रसंगी मातोश्री, भगिनी वगैरे कुटुंबियाना घेऊन देव येथे शिरडीस आले. सर्वांना श्रीचरणी घातले. सेवा रुजू केली. त्यावेळी बापूसाहेब जोगांनी त्यांना सहज विचारले, "अलिकडे केव्हा तुम्ही ज्ञानेश्वरी वाचताना दिसला नाही."

जोगांचे जिव्हाळ्याचे बोलणे ऐकून देवाना सर्व हकिगत सांगणे ओघानेच आले. आपला निश्चयही त्यांनी जोगाना बोलून दाखविला. तो ऐकून जोग म्हणाले, "तुम्हाला एक युक्ती सांगू? ज्ञानेश्वरीची ती प्रत घ्या आणि बाबांच्या हाती द्या. आज्ञा ताबडतोब मिळून पोथीवाचन सुरू होईल. कारण असे की प्रसाद म्हणून बाबा जी पोथी आपल्या हाती देतील ती आपल्या कल्याणासाठीच असते. पण ते कशाला? माझाच अनुभव तुम्हाला सांगतो. ऐका."

जोग देवाना आपला अनुभव सांगू लागले. म्हणाले, "बाळासाहेब, माझ्याकडे लोकमान्यांच्या गीतारहस्याची एक प्रत आहे. ती तुम्ही पाहिली आहे. ती प्रसाद--प्रत आहे. म्हणून मी ती जिवापाड जपतो. रोज रात्री न चुकता ती वाचतो. तिचा इतिहासही थोडा गमतीचा आहे."

तो इतिहास सांगताना जोगानी घसा साफ केला. जणू आलेला गहिवर त्यानी दाबला. मग जोग सांगू लागले. म्हणाले, 'एकदा पोस्टात माझी एका व्ही. पी. आली. ती गीतारहस्याची प्रत होती. पैसे भरून मी प्रत सोडवून घेतली. कागदात गुंडाळलेली ती प्रत तशीच काखेस मारून बाबांच्या दर्शनासाठी मशिदीत आलो.

बाबांना नमस्कार करण्यासाठी खाली वाकलो मात्र--पुस्तक बाबांच्या पायाशी पडले. ते आपल्या हाताने उचलून बाबा म्हणाले, "बापूसाब, ही कशाची काय वंगी आणलीसा?"

बाबांनीच ती बंगी फोडली. ग्रंथ काढून हातात घेतला. पाने उलटून चाळून पाहिला. मग खिशातून एक रुपया काढून तो गीतारहस्याच्या माझ्या प्रतीवर ठेवला. ग्रंथ माझ्या पदरात घालून म्हणाले, " हा ग्रंथ सबंध वाचा हं ! कल्याण होईल. "

जोगानी सांगितलेली ही सर्व हकिगत लक्षपूर्वक ऐकूनही देव जोगांना म्हणाले, " बापूसाहेब, खरे सांगू ? हा सर्व खेळ बाबांचाच आहे. त्यात आपण ढवळाढवळ कशाला करा ! एक दिवस आपण होऊनच बाबा मला सांगितील. ज्ञानेश्वरी वाच म्हणून.

मग त्या दिवशी देव मामलेदार दर्शनाला गेले. बाबांच्या समोर एक रुपया ठेवला. हे पाहून बाबा म्हणाले, " एकच का ? मला वीस रुपये दे. "

दुसरे दिवशी देव पुन्हा दर्शनाला गेले. तेव्हा बाबा म्हणाले, " मला वीस रुपये दे. "

देवानी वीस रुपये बाबांपुढे ठेवले. संतोषाने ठेवले. गर्दी फार, म्हणून एका बाजूस एका खांबाआड उभे राहिले.

हे पाहून बाबांनी त्यांना हटकले. म्हणाले. " अरे, कोठे रे दडला तो ? मला सातच रुपये दिले आणि पळाला ! एखाद्या चोरासारखा ! "

देव पुढे झाले आणि म्हणाले, " नाही बाबा. मी वीस रुपये दिले. ते तुमचेच आहेत. "

हे ऐकून बाबा म्हणाले, " मग तुम्ही असे चोरासारखे दडून का हो बसला ? पळत का हो सुटला ? या की असे पुढे ! बसा की माझ्यासमोर ! "

बाबांच्या आज्ञेप्रमाणे देवानी केले. आज्ञाधारक लेकराप्रमाणे बाबांजवळ बसून राहिले.

मग आरती झाली. प्रसाद घेतला. निघाले. स्वस्थानी जाण्याऐवजी कालच्या त्या बाळकरामाला गाठले. पुन्हा पृच्छा सुरू झाली, " अहो काल तुम्ही मला सांगितले होते, की उद्या आरती झाल्यानंतर मी तुम्हाला सांगेन म्हणून. तर मला आता सांगा की तुम्ही कोण ? कोठले ? येथे यावेसे तुम्हास का वाटले ? कोणामुळे तुम्ही येथे आला ? घरी कोण-कोण आप्त आहेत ? ते कोणकोणता उद्योग करतात ? त्यांची सांपत्तिक स्थिती कशी आहे ? "

बाळकरामाने स्वतःबद्दल देवाना संपूर्ण माहिती दिली. ती ऐकून खूष होऊन देव त्याला म्हणाले, " अरे वा ! तुम्ही तर प्रपंचात खूपच अलिप्त दिसता. आता मला सांगा पाहू, की बाबांनी तुम्हाला उपासनेला कसे लावले ? आत्म-ज्ञानाच्या मार्गाकडे कसे ओढून आणले ? काय युक्ती केली ? कालपासून मी तुम्हाला येथे पाहातो आहे. तुमची एकंदर वागणूक पाहून मला मोठे कौतुक

वाटले. कुतूहलही वाटले. म्हटले, यांना काही गोष्टी विचारून खुलासा करून घ्यावा. तेवढेच मनाचे समाधान होईल."

मंडपात उभे राहून देवानी चालविलेल्या या चौकश्या बाबांना आवडल्या नसाव्यात. म्हणूनच की काय, दुसऱ्याच क्षणी बाबांनी त्यांना चंद्रू या महाव्याधी झालेल्या आपल्या सेवेकऱ्यामार्फत हटकले. देव समोर येताच मशिदीच्या दोन्ही तटावर दोन हात ठेवून उभे राहिलेले बाबा म्हणाले, "कोणाशी कशाचे काय बोलणे चालले होते?"

देव नम्रपणे म्हणाले, "काही नाही. काकांच्या माडीवर तो बाळकराम म्हणून एक भक्त आहे. त्याच्याशी सहज बोलत होतो. तुमच्याच गोष्टी चालल्या होत्या."

बाबांनी देवाना पंचवीस रुपये आणण्याची आज्ञा फर्मावली. धावत बिऱ्हाडी जाऊन देवानी पंचवीस रुपये आणून बाबांच्या चरणी सादर केले. तेव्हा दटावल्याप्रमाणे बाबा त्यांना म्हणाले, "किती आहेत ते रुपये?"

देवानी 'पंचवीस रुपये' एवढेच उत्तर दिले. खाली मान घालून उभे राहिले. तेव्हा बाबा त्याना म्हणाले, "चल ये वर! बस असा माझ्यासमोर!"

बाबा स्वतः खांबापाशी बसले. देव त्यांच्या समोर. तिसरे कोणीही तेथे नाही.

अशा एकांताच्या गंभीर वातावरणात एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने चोराला तपासात घ्यावे त्याप्रमाणे बाबा तीव्रपणे पण खालच्या आवाजात म्हणाले, "तू माझी चिंधी चोरलीस!... माझी नजर चुकवून!"

हे आपणावर काही तरीच बालंट आले म्हणून देव गडबडले. चिंधी आपण डोळ्याने पाहिलीसुद्धा नाही असे सांगू लागले. तरी बाबांचा त्यांच्यावरील संशय जाईना. म्हणू लागले, "चोरी करून वर लपवाछपवी करतोस? कुणी एखाद्या काटर्याने ती चोरली असेल असे म्हणतोस? त्या वेळेला दुसरे कोण होते येथे? तुझ्याशिवाय दुसरे कोण चोरणार माझी चिंधी!"

बोलता बोलता बाबांच्या रागाचा पारा चढला. देवांच्या माय-भगिनींचा उद्धार सुरू झाला. म्हणू लागले, "असा घाबरून-भिऊन आता पळतोस कोठे? पुरता माझ्या तावडीत सापडलास! ऊस तोडावा तसा तुला तोडतो! जागचा हललास तर मुडदा पाडतो!

अरे, येथे येता ते काय चोऱ्या करायला! बघता बघता दुसऱ्याची वस्तू लांबवायला! काळ्याचे पांढरे होऊन शेणी नदीकडेला गेल्या तरी तुमची ही जन्मखोड! ती मेल्याशिवाय अशी जायची नाही! थांब. आता दावतो तुला इंगा!

देवाना वाटले बाबा आपला सटका आता डोक्यात घालणार! स्वर्गाची वाट आपणास दाखविणार! जिवंत राहाण्याची आता आशाच नको!

इतके झाले तरी देवाना भीती म्हणून वाटली नाही. वाटला तो एक आनंदच. तो आनंद बाबांच्या हातून आपणास मृत्यु येणार याचा ! हा मर्त्य देह बाबांच्या चरणी पडणार याचा ! तरी पण एका गोष्टीचा उलगडा त्याला होईना. ती गोष्ट म्हणजे चोरीस गेलेली ती चिंधी !

इकडे बाबांचे शिव्या देणे अजून चालूच होते. ते आता शिगेला पोचले होते. संतापाने लालेलाल होऊन, पुढे येऊन देवाना म्हणत होते, "कोणाच्या परवानगीने वर आलास ? उतर खाली आधी ! चालता हो माझ्या डोळ्या-समोरून ! हरामखोर साला !"

बाबांच्या चरणी वंदन करून देव वाड्यात आले. घडलेली सर्व हकिगत जोगाना आणि बाळकरामाला सांगू लागले. तरीही मशिदीतील तो ज्वालामुखी उसळतच होता. शिव्याशापांचा दणका सुरूच होता. त्यामुळे तेथे जाण्याची कोणाचीही छाती होईना. त्या बाजूससुद्धा कोणी फिरकेना.

अखेर चार दोन तासानी बाबा आपोआप शांत झाले. सर्वांना मशिदीत बोलावले. देवानाही बोलावणे पाठविले. म्हणाले, "त्या म्हाताऱ्याला दोपारचा मी लई बोललो. त्याच्या मनाला लागले असेल."

आपण होऊनच बाबा बोलू लागले. "अरे, कसली चिंधी आणि काय ? पण नाही म्हटले तरी चोरीच ती ! ती करून चोर नामानिराळा होऊन कसे चालेल ? काही तरी शिक्षा, दंड त्याला पाहिजेच ! निदान चार लाथा कमरेत घातल्या तरी पुरे !"

एवढे बोलून त्या प्रकरणाचे कर्तृत्व जणू बाबांनी झटकले. म्हणाले, "असे असले तरी शिक्षा करण्याचा अधिकार मी स्वतःकडे का घ्यावा ? ते सर्व तो अल्लामिया पाहील. शिक्षा करायची तेव्हा शिक्षा करील. जवळ घ्यायचे तेव्हा जवळही घेईल. बरे असो. ते पुराण बस्स झाले !"

मग देवांकडे वळून बाबा प्रेमाने म्हणाले, "अरे भाऊ, आणि माझी दक्षिणा रे ? ती आण की ?"

देवानी किती आणू म्हणून विचारले तेव्हा बाबा म्हणाले, "आण की बारा रुपये !"

देव दक्षिणा आणण्यासाठी बिऱ्हाडी गेले. पण सुटे रुपये हाती आले नाहीत. नोट होती, पण तिची मोड मिळेना. ही सर्व वस्तुस्थिती देवानी बाबांना सांगितली तेव्हा बाबा म्हणाले, "मोड नसेल तर राहू दे. नकोत मला बारा रुपये. सकाळी तू मला दोनदा दक्षिणा दिलीस नाही ? ते विसरलोच बघ मी ..."

तरीही देवानी रुपये मिळविले. बाबांचे चरणी अर्पण केले. चरणी पुनः-पुन्हा मस्तक ठेवले. तेव्हा बाबा खूष होऊन म्हणाले, "काय रे, तू आताशा काय करीत असतोस ? एखाद्या पोथीचे वाचन-बिचन ..."

'काही नाही' असे उत्तर देवांच्या मुखावाटे बाहेर पडताच बाबा म्हणाले, "रोज नेमाने पोथी वाचत जा."

बाबांच्या या प्रेमळ आज्ञेमुळे देवांचे अंतःकरण गहिंवरून आले. अंगावरील उपरण्याने त्यांनी डोळे पुसले. तोच बाबांचे शब्द पुन्हा कानी आले, "वाड्यात शांत ठिकाणी जाऊन बसावे. तेथे नेमाने न चुकता रोज पोथी वाचावी. मधून मधून जसे येईल तसे निरूपणही करावे. अरे, सबंध भरजरी सुंदर शेला तुला द्यावा म्हणून मी येथे बसलो असताना चिंध्या चोरायला जायची ही तुझी दळभद्री सवय कसली!"

बाबांची आज्ञा शिरसावंद्य मानून त्याच दिवसापासून देवानी ज्ञानेश्वरी वाचण्यास सुरूवात केली. हळूहळू ज्ञानेश्वरीत चित्त रमू लागले. ओव्यापाठी ओव्या वाचू लागले. थोडेफार निरुपणही करू लागले.

आणि एके दिवशी देवांच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला! म्हणाले, "जे आत्मज्ञान प्रिय शिष्याला देण्यासाठी सद्गुरू तळमळत असतात ते घेण्यासाठी गोवत्साप्रमाणे धावण्याऐवजी तो इतरत्रच भरकटत राहिला तर ते सद्गुरूना कसे रुचेल? ते चिंध्या चोरणेच नव्हे काय? बालकरामांकडे अनुभव, प्रचीती, उपासना, वैराग्य इत्यादीसंबंधी ज्या चौकशा मी केल्या त्या म्हणजे चिंध्या फाडणेच नव्हते काय? "रिकाम्या चौकशा आणि चिंध्या यात काय फरक आहे?"

देवानी त्याच क्षणी बाबांची मनोमन क्षमा मागितली. पदरात घेण्यासाठी आणि ज्ञानेश्वरीच्या वाचनातील प्रगतीसाठी कृपेची याचना केली. तोच दुसरे दिवशी पहाटे त्यांच्या स्वप्नात बाबा आले. म्हणाले, "काय रे! आता तरी पोथी समजते की नाही?"

देवानी नकारार्थी उत्तर दिले. तेव्हा बाबा पुन्हा म्हणाले, "मग केव्हा समजणार?

बाबांच्या या कृपावर्षावामुळे देव सद्गदित झाले. डोळे भरून आले. म्हणाले, "आपली कृपा झाल्याशिवाय पोथीवाचन म्हणजे केवळ शीण. कृपेशिवाय पोथीतील गूढार्थ काय समजणार? तत्त्वार्थ हाती कसा येणार! पोथीचे अंतरंग खोलून दाखविण्याची गुरुकिल्ली एका सद्गुरूच्या हाती."

बाबा देवाना म्हणाले, "पोथी वाचताना आपण फारच घाई करता. पोथी कशी सावकाश, अंतरंगात शिरून वाचावी. आता करा पाहू सुरुवात माझ्यादेखत. कशी वाचता पाहू तुम्ही पोथी..."

स्वप्नात बाबा देवांच्या जवळ येऊन बसले.

देव म्हणाले, "काय वाचू?" बाबा म्हणाले, "अध्यात्म वाच."

उठून देव पोथी आणायला निघाले आणि जागे झाले.

नंतर देव मला म्हणाले, " काकासाहेब, सद्गुरूंचे आपल्या प्रत्येक गोष्टीकडे किती लक्ष! पेरणीपूर्वी शेतीची चांगली मशागत करावी. शेतजमीन निर्दोष करून तिला चांगल्या ताली घालाव्या. पाण्यासाठी प्रार्थना करावी तीही एका पर्जन्यराजाची !...

हे क्रमाक्रमाने झाल्यानंतर यथाकाल सद्गुरु शेत पेरतील. म्हणतील, उतावीळ होऊन आता घाई करू नको. ज्या ज्या वेळी जे जे मी सांगेन तेवढेच कर. अधिकही नको किंवा कमीही नको. पीक छानदार येणारच याची हमी तुला मी देतो. तिच्यावर तू श्रद्धा मात्र ठेव. पुढचे सर्व मी पाहीन. "

## नाम संकीर्तन

[पान २ वरून चालू]

१६ भूतपिशाच्च नाना छंद ब्रह्मगिऱ्हो ब्राह्मण समंध
मंत्रचळ नाना खेद नामानिष्ठे नासती

१७ ऐसे ज्याचे जिव्हेवरी नाम नाचे निरंतरी ते धन्य,
धन्य संसारी स्वानंदे हरी गर्जतू

१८ स्मरण देवाचे करावे अखंड नाम जपत जावे
नामस्मरणे पावावे समाधान

१९ सुखदुःख उद्वेग चिंता अथवा आनंदरूप असता
नामस्मरणेविण सर्वथा राहोच नये

२० काहीच न करोनी प्राणी रामनाम वदे वाणी
तेणे संतुष्ट चक्रपाणी भक्तालागी सांभाळी

२१ सहस्रनामामधे कोणी येक म्हणता होतसे सार्थक
नामस्मरता पुण्यश्लोक होईजे स्वये

२२ राम म्हणे वाट चाली, यज्ञ पाऊलापाउली, धन्य
धन्य ते शरीर, तीर्थव्रतांचे माहेर, राम म्हणे करता
धंदा, सुखसमाधी त्या सदा, राम म्हणे भोगी
त्यागी, कर्म न लिंपे त्या अंगी, ऐसा राम जपे नित्य,
तुका म्हणे तो जीवन्मुक्त.

संग्राहक
—बाळकृष्ण सदाशिव धामणकर

श्री साईभक्तांची श्रद्धास्थाने ... ४

# गोव्यातील पिळगावचे श्रीसाई सेवाधाम

● लेखक : श्रीसाईनंद

गोमंतक हा सिंधुसागराच्या बाजूस असलेल्या भारताच्या अतिदक्षिण किनाऱ्यावरील प्रदेश आहे. आपल्या सह्याद्रि पर्वताच्या उतरणीवरून समुद्र-किनाऱ्यापर्यंत गोमंतक पसरलेला आहे. या पर्वताच्या समुद्राकडील वाऱ्याच्या बाजूला गोमंतक बसलेला आहे. भगवान परशुरामांनी सर्व पृथ्वी दान दिल्यावर दान दिलेल्या भूमीतच त्यांना स्वतःला राहवेना म्हणून त्यांनी आपल्या वास्तव्या-साठी नवीन क्षेत्र निर्माण केले. त्याला सूपाच्या आकारासारखा प्रदेश म्हणून 'शूर्पारक' असे नाव मिळाले. शूर्पारक म्हणजे पश्चिम किनाऱ्यावरील आजचे आपले कोकण आणि या कोकण पट्टीतलाच गोवा किंवा गोमंतक आहे.

खरोखरीच गोमंतक चंद्रकोरीच्या आकाराचे नंदनवन आहे. या गोव्याची विभागणी अकरा तालुक्यात केलेली आहे. त्यापैकी डिचोली हा एक तालुका आहे. या डिचोलीत पिळगाव नावाचे एक गाव आहे. आणि येथेही आपले श्रीसाईनाथ महाराज जाऊन पोचलेले आहेत. पिळगाव हे डिचोलीहून अवघे पाच किलोमीटर्स अंतरावर आहे. सावंतवाडी, पणजी, वळपई इ. ठिकाणाहून येथे जाण्यासाठी बसेस मिळतात. पिळगाव येथे श्रीसाई सेवाधाम नावाची एक अध्यात्मिक संस्था आहे आणि येथे शके १८७५ विजयनाम संवत्सरे फाल्गुन शुक्लपक्ष चतुर्दशी गुरुवार ता. १८ मार्च १९५४ रोजी श्रीसाईबाबांच्या प्रतिमेची स्थापना करण्यात आली. ही प्रतिमा श्री विष्णु गोविंद सायनेकर यांच्या उपस्थितीत प्रसिद्ध श्री साईभक्त पांडुरंग गणू शिरोडकर यांच्या हस्ते करण्यात आली.

तिथे पूजा दिनक्रम व दर गुरुवारी भजन हा क्रम चालू होता. नंतर शके १८८० आषाढ शुद्ध पौर्णिमा जुलै १९५८ पासून गुरुपौर्णिमेच्या उत्सवाला सुरुवात झाली. त्यानंतर पुण्यतिथी शके १८८० आश्विन शुक्लपक्ष विजयादशमी मंगळवार ता. २१ ऑक्टोबर १९५८ या दिवशी पुण्यतिथीचा उत्सव प्रारंभ झाला. तो क्रमाक्रमाने साईनाथांच्या कृपेने उत्तरोत्तर भक्त मंडळीकडून हे श्री साईनाथांचे उत्सव वृद्धिंगत होत गेले, व नंतर रामनवमीचा उत्सवसुद्धा साजरा करण्यात येऊ लागला. अशा तऱ्हेने बाबांच्या कार्याला चालना मिळू लागली.



गोव्यातील पिळगावचे श्रीसाई सेवाधाम

आज येथे श्री साईबाबांची दररोज पूजा व संध्याकाळी धुपारती केली जाते. प्रत्येक गुरुवारी भक्तांकडून अभिषेक व रात्रौ स्थानिक भजनी कलाकारांचा भजनाचा कार्यक्रम असतो.

शके १८९४ आश्विन शुक्लपक्ष विजयादशमी मंगळवार ता. १७-१०-७२ या दिवशी श्री. गोविंद रामेश्वर सायनेकर यांच्या उपस्थितीत संस्थेचे नामकरण उद्‌घाटन समारंभ व ध्वजपूजन केले श्री साईभक्त पांडुरंग गणू शिरोडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले व संस्थेचे नाव "श्री. साई सेवा धाम" ठेवण्यात आले.

त्यानंतर कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली. त्यात अध्यक्ष श्री. यशवंत रामचंद्र पिळगांवकर, सेक्रेटरी— श्री. गजानन रामा गांवकर, खजिनदार – दादू बाबलो परुळकर व दहा सभासदांची निवड करण्यात आली. हे कार्यकारी मंडळ संस्थेचे काम तळमळीने व मोठ्या आवडीने करताना दृष्टीस पडते. बाबांच्या कार्याची झपाट्याने वाढ व्हावी अशी कार्यकारी मंडळाची व गावच्या सर्व लोकांची इच्छा आहे व त्या परीने ते झटत आहेत.

आतापर्यंत संस्थेला दर गुरुवार साजरा करणारे एकूण ४८ सभासद लाभलेले आहेत. ते सर्व आपला प्रत्येक गुरुवार मोठ्या उमेदीने साजरा करताना आढळतात.

बाबांचे उत्सव साजरे करण्यासाठी वर्गणीच्या रूपाने पैसे गोळा करतात. सबंध गोव्यातून व मुंबईतून पावती बुकांच्या रूपाने गेली दोन वर्षे प्रामाणिकपणे वर्गणी जमविण्याचे काम गावातील व मुंबईतील साईभक्त मोठ्या उमेदीने करतात. त्यातल्या त्यात मुंबईतील साईभक्तांचा वर्गणी देण्यात पहिला क्रमांक लागतो. सन १९७३ च्या पुण्यतिथीच्या वेळी मुंबईतील साईभक्तांनी फूल ना फुलाची पाकळी देऊन उत्सव साजरा करण्यासाठी मदत केली. संस्था त्यांची सदैव आभारी आहे.

खर्च होऊन जी रक्कम शिल्लक राहते ती मंदिर उभारण्यासाठी राखून ठेवण्यात आली आहे. शिल्लक रक्कम बाबांच्या कार्यासाठीच वापरली जाईल असे आश्वासन कार्यकारी मंडळाने प्रत्येक देणगीदाराला दिलेले आहे. बाबांचे भव्य मंदिर उभारण्याचे प्रत्येकाच्या मनात आहे. परंतु पैशाअभावी आशा आकांक्षाची पूर्ती होत नाही.

प्रत्येक पुण्यतिथीला श्री गोपी रामा उसापकर आणि बंधू यांच्या वतीने समराधना घालण्यात येते व त्याचबरोबर भजनाच्या कार्यक्रमात गोव्यातील नामवंत भजनी कलाकार भाग घेऊन काही मोबदला न घेता विनामूल्य आपली कला साईचरणी पेश करतात.

यंदाची बाबांची पुण्यतिथी मंडळाने मोठ्या प्रमाणात साजरी करण्याचे ठरविले आहे. यंदाच्या पुण्यतिथीला सहा फूट उंच, तीन फूट रुंद अशी श्री साईबाबांची

प्रतिमा व १॥ फूट लांब गोमुखी पादुका स्थापन करण्यात येणार आहेत. प्रतिमा व पादुका मुंबईतील साईभक्तांनी दिली आहे. प्रतिमा मुंबईतील एक गुणी कलाकार चित्रकार श्री. अनंत गावडे यांच्या कुशल कुंचल्यातून चितारली गेलेली आहे. शिर्डीच्या द्वारकामाईत श्री. जयकरांनी बाबांची जी प्रतिमा चितारलेली आहे त्याबरहुकूम ही डिट्टो प्रतिमा आहे. ह्या कामी संस्थेचे प्रेरणेने मुंबईत वास्तव्य करून असलेले श्रीयुत पांडुरंग गणू शिरडकर हे मोठ्या तळमळीने बाबांच्या कार्यासाठी झटत आहेत. बाबांची लीला अगाध आहे. ते आपल्या साक्षात्काराने कोणते काम कोणाकडून करवून घेतील सांगता येत नाही.

पिळगांवचे बाबांचे कार्य दिवसे दिवस वाढत जात आहे. कार्यकारी मंडळ फक्त नामधारी आहे. साईबाबा आपले काम मंडळाकरवी किंवा दुसऱ्या साई-भक्तांकरवी व्यवस्थित पार पाडतात. मुंगीच्या पावलाने झालेली ही प्रगती आहे. सध्यतरी गाव पिळगाव बाबांच्या कृपेने अर्धी शिर्डी बनलेला आहे. ह्यामागे सर्व साईभक्तांवर व गावावर बाबांची संपूर्ण कृपा आहे.

## साई वंदन

ज्यांचे घरीं साई ध्यास – तेथें शांति नांदे खास ॥
साई मूर्ति ध्यानी धरा – मन शांतीचा मिळे झरा ॥
कलीयुगी तरणोपाय – धरावे साईचे पाय ॥
मन करा रे निर्मळ – देव अंतरीच भेटेल ॥

× × ×

गया प्रयाग धाम – शंकर दत्त हा श्याम
वसूदेव जानकी राम – करी पूजा हेची काम
रीझवावी काया काम – रहातो तेथ घनःश्याम
सुमनाने मिळे आराम – शिळा पावन केली राम
तारील हेच शिर्डी धाम – वसूदेव नंदन श्याम

— सौ. माई आडकर

## हेच सार

जन्म आणि मृत्यू । यांचा करी टाळ
कुटी सर्व काळ । नियती ही १

जन्म कुणा पोटी । प्राण कुणा हाती ?
ठरविती वृत्ती । कर्म–दैत्य २

देहा देहा मध्ये । वासनांना शक्ति
आसक्ति विरक्ती । चित्ताचीच ३

चैतन्याला लागे । जडाचीच जोड
जीवनाचे खोड । जगे देही ४

एकाचा हो 'नाश' । तेथ दुजा जन्म
परस्पर दास । वाढ–झड ५

वा कशासाठी । केलास प्रपञ्च
परस्परा जाच । हेच सार ६

— श्रीराम पंडित

# पावसचे स्वामी स्वरुपानंद

● रमाकांत पंडित

स्वामी स्वरुपानंदाचा जन्म पावस येथे १५ डिसेंबर १९०३ रोजी झाला. त्यांच्या वडलांचे नाव विष्णुपंत व आईचे नाव रखुमाबाई. दोघेही धार्मिक वृत्तीची असल्यामुळे लहानपणीच त्यांच्या मनावर चांगले संस्कार व आचार-विचार घडले. त्यांचा गौरवर्ण, पाणीदार डोळे व बोलका स्वभाव यामुळे ते सर्वांचे आवडते झाले व त्यांना सर्वजण 'आप्पा' असे म्हणत. त्यांचा स्वभाव लहानपणी द्वाड होता, पण बुद्धि कुशाग्र होती. वयाच्या ६ व्या वर्षी त्यांच्या शिक्षणास सुरवात झाली. त्यांचे शिक्षण पावस, रत्नागिरी, पुणे व मुंबई येथे झाले. १९२२ साली त्यांनी टिळक विद्यापीठाची प्रवेश परीक्षा दिली. त्यांना संस्कृत व मराठी या विषयांची उपजतच आवड होती. त्यानंतर एक वर्षाने ज्ञानेश्वरीचे महान उपासक बाबा वैद्य यांचा सहवास घडला. त्याचवेळी त्यांचे गुरु-शिष्याचे नाते जुळले व ते शेवटपर्यंत टिकले. सोऽहं भावाच्या सतत जपाने देहशुद्धीचे निराकरण होऊन पूर्वस्थितीचा अनुभव येईल असा उपदेश त्यांना वैद्यानी दिला.

स्वामी स्वरुपानंदानी आपल्या सेवावृत्तीला देशभक्तीची जोड देऊन स्वावलंबनाश्रम सुरू केला व पुष्कळ विद्यार्थ्यांना शिकवून तयार केले. त्यांनी कृष्णाष्टमी, गणपति-उत्सव, पोवाडे रचणे, सूतकताई सुरू करणे व स्तोत्रे शिकवून धार्मिक व राष्ट्रीय वृत्तीची जोपासना केली. १९३२ मध्ये ज्यावेळी म. गांधीजीनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला त्यावेळी त्या चळवळीत त्यांनी भाग घेतला होता व त्यांत त्यांना तुरुंगवासही घडला होता. तुरुंगातून मुक्त झाल्यावर ते परत पावस गावी आले. आपल्या गोड भाषणाने व सौजन्याने त्यांनी आपला मित्रपरिवार वाढविला होता. १९३४ मध्ये त्यांना एकाएकी जबरदस्त आजारपण आले. त्यामुळे त्यांनी गृहस्थाश्रमाचा नाद सोडून देऊन ते सोऽहं या भावात तन्मय झाले व तो जप त्यांनीं अखेरपर्यंत ठेवला होता. याचवेळी त्यांना काव्यप्रतिभेची जागृति झाली व त्यांनी 'अमृतधारा' हा काव्य-संग्रह लिहून काढला. गेली कित्येक वर्षे ते आंबेवाले देसाई यांच्या घराच्या पडवीत रहात होते. त्यांची रहाणी साधी होती. स्वावलंबन हे त्यांचे जीवन होते. त्यांच्याकडे येणाऱ्यांना ते प्रासादिक ग्रंथ व खडीसाखरेचा प्रसाद देत व 'सोऽहं' ची साधना करा असा उपदेश करीत. अत्यवस्थ असतानाही आत्मिक इच्छाशक्तीच्या बळावर स्वामींनी काही भक्तांना अनुग्रहही दिला. ऐन तारुण्यात

स्वातंत्र्यासाठी त्यांनी स्वदेशी वृत्तीचे पालन करून सत्याग्रह केला होता, आणि म्हणूनच भारतमातेच्या स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सव प्रसंगी म्हणजेच १५ ऑगस्ट १९७४ रोजी कोकणच्या ह्या महान संताने आपली जीवनयात्रा संपविली. तो दिवस म्हणजे गुरुवारचा गुरुपुष्पामृत द्वादशीचा सुवर्णदिन होता. स्वामी स्वरुपानंदानी तो अगदी योग्य रितीने साधला. ह्याच दिवस रामकृष्ण परमहंसांचा महानिर्वाणाचा दिवस होय. अशा या पवित्र दिवशी स्वामी स्वरुपानंदांनीही महानिर्वाण केले हा योगायोगच म्हटला तरी चालेल. असा हा महान संत यापुढेही दीपस्तंभाप्रमाणे राहून आपल्या भक्तांना मार्गदर्शन करील यात मुळीच शंका नाही.

---

## शिरडी वृत्त-माहे ऑगस्ट सन १९७४

या महिन्यात अधिक भाद्रपद आल्यामुळे बाहेरगावचे साईभक्तांची, श्रींच्या दर्शनासाठी गर्दी बरीच होती. शिवाय सत्यनारायणपूजाही बऱ्याच झाल्या. काही कलाकारांनी श्रींच्यापुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन :**— (१) संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशीशास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली. (२) ह. भ. प. भास्कर विष्णुबुवा भारदे. अमळनेर. (३) ह. भ. प. किसन शंकर आदोडे. वैजापूर. (४) सौ. ललितप्रभा महेश कुलकर्णी. गणेशपुरी. (५) ह. भ. प. सातारकर आक्काताई. कऱ्हाड. (६) ह. भ. प. कृष्णाबाई येवलेकर. सातारा. (७) ह. भ. प. रमेश सखाराम मराठा. जि. जळगांव. (८) ह. भ. प. लक्ष्मण-बुवा वाकूचौरे शिर्डी यांचे भजनी निरुपण झाले.

**प्रवचन :**— श्रीमान शांताराम आठवले पुणे यांचे ज्ञानेश्वरीवर प्रवचन झाले.

**भजन, गायन, वादन :**— (१) श्री. बाबू गो. बोरगांवकर. (२) श्री. राम कमलाकर बोरगांवकर. लातूर. (३) कु. उषा जयसिंगाणी. मुंबई. (४) सौ. शुभलक्ष्मी थत्ते. (५) कु. पद्मा थत्ते. श्रीरामपूर. (६) श्री. वसंतराव किणीकर. श्रीरामपूर. (७) श्री. पांडोबा गुरव. श्रीरामपूर. (८) श्री. दामूअण्णा म. दळवी. श्रीरामपूर. (९) श्री. दुष्यंतकुमार भट. अहमदाबाद. (१०) श्री. जगमोहनलाल शहा. मुंबई. (११) भगवान श्रीसत्यसाईबाबा उल्हास समिती भजन मंडळी. मुंबई. (१२) श्री. दत्तात्रय जोशी. श्रीरामपूर. (१३) श्रीमती इंदिराबाई मु. गुजराथी. येवला. (१४) श्री. पांडुरंग सौ. उगले. कोपरगाव. (१५) श्री. रंगनाथ दे. जाधव. कोपरगाव. (१६) कु. इंदू रंगनाथ पवार. कोपरगाव. (१७) कु. नंदा दि. मल्याळी. कोपरगाव. (१८) कु. मालिनी कपिलेश्वरी. मुंबई.

**श्रीकृष्ण जयंती :—** श्रीकृष्ण जयंती निमित्त श्रींचे मंदिरात शनिवार दि. १०–८–७४ रोजी रात्रौ श्रीकृष्ण जयंती किर्तन संस्थान गवई यांचे झाले व दुसरे दिवशी गोपालकाला, कीर्तन, दहीहंडी व रात्रौ श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**स्वराज्यप्राप्ति दिन :—** १५ ऑगस्ट रोजी श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी तर्फे कोर्ट रिसीव्हर श्री का. सी. पाठक यांचे शुभ हस्ते प्रति वर्षाप्रमाणे ध्वजवंदनाचा कार्यक्रम, श्रींचे मंदिरावरील कळसाजवळ झाला. कार्यक्रमास संस्थान नोकर वर्ग, श्रीसाईनाथ हायस्कूल बॅन्ड पथक, शिक्षक वर्ग, होमगार्डस्, विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्रतिष्ठित भक्त, पाहुणे मंडळी, उपस्थित होती. त्यांना चहापान देण्यात आले.

**माननियांच्या भेटी :—** ( १ ) श्री. एस. एस. जामवाल IAS चीफ एक्झिकेटिव्ह ऑफिसर, जि. प. धुळे. ( २ ) श्री. आर. प्रेमकुमार IAS चीफ ऑफिसर जिल्हा परिषद, अहमदनगर. ( ३ ) एस. ह. सुखटणकर IAS नगर-विकास व सार्वत्रिक आरोग्य खाते, महाराष्ट्र राज्य. ( ४ ) श्री. श्रीनिवास चोपडे, कृषि संचालक महाराष्ट्र राज्य. ( ५ ) श्री. व्ही. सुंदरम् IAS जिल्हाधिकारी अहमदनगर. ( ६ ) श्री. भोगले, ऑडिशनल चीफ कॉंझरवेटर ऑफ फॉरेस्ट महाराष्ट्र. ( ७ ) श्री. कागदे, अंडर सेक्रेटरी, रेव्हीन्यू डिपार्टमेंट, महाराष्ट्र राज्य. ( ८ ) श्री. श्रीनिवास पाटील, प्रांत ऑफिसर, संगमनेर. ( ९ ) श्री. विलासराव पाटील असि. कलेक्टर अ. नगर. ( १० ) श्री. मुजावर साहेब, अन्नपुरवठा अधिकारी, अ. नगर. ( ११ ) जंबूनाथन, जनरल मॅनेजर, एस. टी. कार्पोरेशन महाराष्ट्र. ( १२ ) श्री. एस. के. वानखेडे, सभापती विधानसभा महाराष्ट्र राज्य. ( १३ ) श्री. बुचके, असि. चारिटी कमिशनर पुणे रिजन, पुणे.

**हवा-पाणी :—** शिरडीतील हवा-पाणी उत्तम असून, रोगराई काही नाही.

Regd. No. MH/BYE/26


# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४″ × २०″ | रु. १–५० | ८″ × १०″ | रु. ०–५० |
| १०″ × १४″ | रु. १–०० | २½″ × ३½″ | रु. ०–२० |
| ४½″ × ५½″ | रु. ०–३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. **डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉक्सवरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिलेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १–५० |
| २. शिलेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ,, ,, | १–२५ |
| ३. शिलेवर बसलेले बाबा | ,, | २२.८६ × ३३.०२ | ०–५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ,, ,, | ०–५० |
| ५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा अल्बम) | | | २–०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४



मुद्रक : **पांडुरंग मोरे,** बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.

४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१.

संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,

खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.